

# श्री साईलीला

जून कि. ५० पैसे १९६८

१५८



# श्री सा ई वा क्सु धा

"मी एक फकीर आहें. मला घरदार, बायको कोणीही नाहीं, सर्व प्रकारच्या चिंतेंतून मुक्त होऊन मी एकाच ठिकाणीं रहात आहें. तरीही मायेच्या तावडींतून मी सुटलेला नाहीं. ती मला वारंवार सतावीत असते. मी स्वतःला विसरूं शकतों; परंतु त्या बयेला मात्र विसरूं शकत नाहीं. ब्रह्मदेवाला मायेनें सोडलें नाहीं मग माझ्यासारख्याचें काय ? जे भगवंताला सर्वपरीनें शरण जातात तेच त्याच्या कृपाळूपणामुळें तिच्या तावडींतून सुटूं शकतात.

—श्रीसाईच्चरित

---


श्री साईलीला

[ शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक ]

वर्ष ४७ वें ] जून १९६८ [ अंक ३ रा

: संपादक :

**श्री. द. दि. पाटणकर**

वार्षिक वर्गणी रु. ५ ( ट. ख. सह )

**टे. नं. ४४३३६१**

: कार्यालय :

**साई निकेतन, डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कलजवळ, प्लॉट नं. ८०४ बी, दादर मुंबई १४.**

# बाबांची सुवर्णमहोत्सवी पुण्यतिथी

प्रिय वाचक—

श्रीसाईबाबांच्या निर्याणास यंदां पन्नास वर्षें होत असून त्यानिमित्त येत्या सप्टेंबर–आक्टोबरमध्यें त्यांच्या पुण्यतिथीचा सुवर्ण–महोत्सव त्यांच्या असामान्य व भव्य कार्यास साजेशा स्वरूपांत शिरडी येथें व मुंबईंतही मोठ्या समारोहानें साजरा केला जाणार आहे. या अंकांत त्या महोत्सवासंबंधानें सर्वसाधारण कल्पना करून देणारा एक लेख प्रसिद्ध होत आहे. त्याकडे, आमच्या वाचकांचें नि साई–भक्तांचें लक्ष जाईल अशी आशा आहे.

साईबाबांचा पन्नासावा पुण्यतिथ्युत्सव म्हणजे हजारो, नव्हे लक्षावधि लोकांच्या, एवढेंच नव्हे, तर अखिल मानवजातीच्या कल्याणासाठीं झटणाऱ्या महापुरुषाचा महोत्सव. त्यांत प्रत्येकानें आपल्या परीनें सहभागी होणें हें त्याचें पवित्र कर्तव्य आहे.

शिरडी येथें बाबांचें वास्तव्य झालें व तेथें त्यांचें निर्याण झाल्यामुळें तें गांव त्यांच्या वास्तव्यानें तसेंच पादुका–स्थापनेनें पुण्यपावन झालें आहे. शिरडी हें नगर जिल्ह्यांतील एक बाजूला वसलेलें लहानसें खेडें असलें तरी बाबांच्या वास्तव्यामुळें आजकाल त्याला पुण्यक्षेत्राचें महत्त्व प्राप्त झालें आहे. तेथें सुवर्ण-महोत्सव मोठ्या समारोहानें साजरा केला जाणें हें अगदीं स्वाभाविक असलें तरी मुंबई म्हणजे महाराष्ट्राची गजबजलेली राजधानी. तेव्हां या राजधानीच्या शहरांतही तो उत्सव साजरा होणें जरूर होतें. ही जरूरी व त्याची उपयुक्तता नि सर्वपरीनें महत्त्व लक्षांत घेऊन उत्सवचालकांनीं शिरडीच्या उत्सवानंतर लागोपाठ मुंबानगरींतही तो उत्सव सतत चार दिवसपर्यंत मोठ्या संस्मरणीय रीतीनें साजरा करण्याचें धोरण स्वीकारलें, याबद्दल महोत्सव–समिति अभिनंदनास पात्र आहे.

त्यामुळें काय होणार आहे ? ज्यांना मनांत फार असूनही कांहीं ना कांहीं कारणांमुळें शिरडीस जाणें शक्य होणार नाहीं त्या मुंबईंतील नि मुंबईच्या आसपासच्या भागांतील व भारतांतील अनेक साईभक्तांना मुंबईंतील महोत्सवाचा लाभ घेणें सोयीस्कर होणार आहे.

शिरडीप्रमाणें हा उत्सव मुंबईंत होणार असला तरी शिरडी ती शिरडी व मुंबई ती मुंबई, असें कोणालाही वाटायला नको; कारण त्या चार दिवसांत मुंबईत शिरडी अवतीर्ण होणार आहे! म्हणजे काय ? उत्सवस्थळीं शिरडींतील वातावरण निर्माण करण्यांत येणार आहे. शिरडी येथील श्रीसाईबाबांच्या पादुका पालखींतून वाजत गाजत मिरवणुकीनें मुंबईंत आणण्यांत येणार आहेत व परळवरील सेंट् झेवियर जिमखान्याच्या भव्य पटागणांवरील तात्पुरत्या वास्तूंत त्यांची समारोहपूर्वक स्थापना करण्यांत येणार आहे. तेथें काकड आरती, भजन पूजन, प्रवचन, कीर्तन, अभिषेक वगैरे शिरडीप्रमाणें सर्व कार्यक्रम रात्रंदिवस चालू रहाणार आहेत.

मुंबईंतही उत्सव साजरा होणार याचा आणखी एक फायदा होण्याचा संभव आहे. शिरडी क्षेत्रांत भक्तांची गर्दी नेहमींचीच असते. परंतु येत्या पुण्यतिथी महोत्सवाच्यावेळीं त्या गर्दीचें प्रमाण वाढत वाढत कोणत्या थराला जाईल हें आज कोणालाही सांगतां येणार नाहीं. न जाणो तो अपरंपार गर्दीचा ओघ मुंबईंत साजऱ्या होणाऱ्या महोत्सवामुळें थोडा कमी होण्याची शक्यता आहे आणि तसें घडणें जरूरही आहे.

कारण शिरडी हें एका बाजूस असलेलें एक खेडें. तेथें भक्तजनांच्या सुखसोयींसाठीं जरूर व शक्य ती सर्व व्यवस्था करण्यांत येणार आहे. व ती करणें जरूर आहे हें खरें असलें तरी भक्तजनांच्या गर्दीला थोडा जरी आळा घालतां आला तरी तो इष्ट होणार आहे.

कसेंही असो. दोन्हीं ठिकाणच्या उत्सवांची योजना अत्यंत विचारपूर्वक आखण्यात येत आहे. सर्वांच्या सुखसोयीचा प्रश्न मुळींच दृष्टिआड करण्यांत आलेला नाहीं.

श्रीसाईबाबांची सुवर्णमहोत्सवी पुण्यतिथी येत्या सप्टेंबरमध्यें आपण मोठ्या समारोहानें साजरी करीत आहोंत त्यावेळीं भक्तांसाठीं विविध स्वरूपाचे मनोरंजक, शैक्षणिक, प्रबोधक व मनावर कायमचा ठसा उमटविणारे कार्यक्रम केले जाणार आहेत. हें सर्व ठीक असलें तरी जें लोककल्याण साधण्यासाठीं भूतलावर बाबांचें आगमन झालें, त्या लोककल्याणासाठीं, म्हणजे बाबांचें ध्येय साध्य करण्यासाठीं अविरत व अखंड झटणें हें आम्हां सर्वांचें पवित्र कर्तव्य आहे.

तें ध्येय साध्य करण्यासाठीं 'श्रीसाईबाबा फाउंडेशन' स्थापन होत आहे. या फाउंडेशनसाठीं पन्नासलक्ष ते एक कोटी पर्यंत निधि जमा करण्यांत याव-याचा आहे. या फाउंडेशनच्या विश्वस्तांमध्यें सरकारी व निमसरकारी किंवा स्वतंत्र अशी फार थोर मंडळी सामील झाली आहे. या अंकांत दुसरीकडे त्यांचीं नावें जाहीर करण्यांत येत आहेत त्यावरून विश्वस्त मंडळाची कल्पना करतां येईल. जनतेची शैक्षणिक, धार्मिक, सामाजिक, शेतकीविषयक व नैतिक पातळी वाढावी, जनतेच्या जीवनांत भव्यता, उपयोगिता, परस्पर बंधुभाव वाढावा व सर्वांना सुख आणि समाधान लाभावें ही जी बाबांची इच्छा व दृष्टि होती, तिचें शक्य त्या परीनें पोषण व वाढ करणें, हा या फाउंडेशनचा मूलभूत उद्देश आहे.

अशा या पवित्र व बाबांचे उद्देश साध्य करण्यासाठीं स्थापन झालेल्या फाउंडेशला सर्वांनीं हस्तें परहस्तें जास्तींत जास्त हातभार लावून हें महत्तम कार्य सफल करण्यासाठीं यावेळीं पुढें यावें, अशी आमची कळकळीची विनंती आहे.

—संपादक

150

# शिरडीचे महापुरुष श्रीसाईबाबा

लेखिका : —श्रीमती मणी साहुकार

परिचय – या लेखाच्या लेखिका श्रीमती मणी साहुकार ह्या श्रीसाईबाबांच्या एकनिष्ठ भक्त असून त्यांनीं निरनिराळ्या दृष्टिकोनांतून बाबांच्या कार्याची आजवर महती गायिली आहे. त्यांचें शिक्षण येथील एल्फिन्स्टन् महाविद्यालयांत झालें. लेखनाप्रमाणें गायन कलेचीही त्यांना आवड आहे. त्यानीं अपील इन् इंडियन म्युझिक, कृष्ण-संगीत, शिरडीचे महापुरुष श्रीसाईबाबा वगैर ग्रंथ-लेखन केलें आहे.

भारत ही पुण्यभूमि आहे. या देशाचा आरंभकाळापासूनचा इतिहास पाहिला असतां असें दिसून येतें कीं, या भूमींत अनादिकाळापासून वेळोवेळीं अनेक साधुसंत अवतीर्ण झाले व त्यांनीं जनतेला सन्मार्गास लावण्याचें कार्य पार पाडिलें आहे. ही संतांची जन्मभूमि आहे. या देशाला वेळोवेळीं अनेक आपत्तींना नि संकटांना तोंड द्यावें लागलें; तरीही जनता धर्माभिमुख असल्यामुळें व तिच्या देवधर्मावरील श्रद्धेमुळें हा देश सर्व संकटांस पुरून उरला आहे व मानाचें जीवन जगत आहे. आध्यात्मिकता ही या देशांतील लोकांच्या रक्तांतच भिनलेली आहे. साधुसंतांची ही परंपरा अखंड चालू आहे. त्यांचें जीवनकार्य कोणाच्याही मनाला मोहिनी घालणारें व त्याला अध्यात्माकडे प्रवृत्त करणारें आहे. त्या संतांची गणना महापुरुषांत करतां येईल. असे एक महापुरुष म्हणजे शिरडीचे श्रीसाईबाबा हे होत.

सुमारें शंभर वर्षांपूर्वीच्या काळांत शिरडी येथें एक महायोगी वय वर्षें वीस, एकाएकीं आढळून आला. त्या देखण्या तरुणाच्या हातांत एक भिक्षापात्र होतें व त्याच्या अंगावर कफनी होती. तो त्या गावांत आला आणि एका निंबाच्या झाडाखालीं बसला. गावांत कोणी ना कोणी फकीर येतात कीं नाहीं, तसाच तो सर्वसाधारणपणें दिसत होता. लोकांनीं प्रथमदर्शनीं तसाच समज करून घेतला. परंतु आत्मतेज कुठें दडून का रहातें ? त्याचा प्रभाव पडल्याशिवाय कसा राहील ? आस्ते आस्ते आपल्या लीलांनीं त्यानीं गावांतील लोकांचें

लक्ष स्वतःकडे खेचून घेतलें. त्यांच्या सभोंवार लोकांचा जमाव जमूं लागला. शिरडी गावाचें वैभव वाढायचें होते आणि तें साईबाबांमुळें इतकें वाढत गेलें की तेथें दर्शनासाठीं शेकडो नव्हे, हजारो लोक प्रत्यहीं जमा होऊं लागले व शिरडी गांव श्रीसाईबाबांचें शिरडी संस्थान या नावानें सर्वत्र ओळखलें जाऊं लागलें.

साईबाबा जन्मले कधीं व त्यांचे आई वडील कोण, हें कोणालाही कधीं समजलें नाहीं. बाबांनींही त्या गौप्यावर कधीं प्रकाश पाडला नाहीं. हिंदुलोक त्यांना भगवंताच्या अनेक अवतरांपैकीं एक समजूं लागले तर मुसलमानबंधू त्यांना अल्लानें भूतलावर पाठविलेला पीर समजूं लागले. प्रत्येकाला बाबांच्या-ठायीं आपल्या पूज्य दैवताची जाणीव होऊं लागली. बाबांनीं आपल्या भक्तां-पुढें एक पेचप्रसंग निर्माण केला म्हणाना. तें कोडें कोणालाही उलगडतां येईना. फकीरासारखा वेष परिधान करणें आणि त्याचबरोबर हिंदूप्रमाणें गंध-टिळा लावून घेणें किंवा पूजा अर्चा करून घेणें हें चालूच असे. मोडकी मशीद हें त्यानीं आपलें घर बनविलें होतें आणि तेथें अखंड धुनी पेटवून ते वास्तव्य करीत असत. मुसलमान भक्तांजवळ ते कुराणांतील वचनांचा उल्लेख करीत असत तर हिंदुभक्तांजवळ ते त्यांच्या वेद उपनिषदांच्या भाषेंत बोलत असत. दोन्हीं समाजांतील लोक त्यांच्यापुढें भक्तिभावानें लोटांगणें घालीत असत हें होतें त्यांचें वैशिष्ठ्य.

अशा या साईबाबांच्या महासमाधीला पन्नास वर्षें लोटलीं असलीं व ते त्या लहानग्या अप्रसिद्ध शिरडी गावांत प्रथम अवतीर्ण झाले त्या काळास सुमारे शंभर वर्षें लोटलीं तरी त्यांची भक्तजनावरील पकड बिलकूल कमी न होतां तो भक्तिभाव उत्तरोत्तर वाढतच चालला आहे. अशी आहे त्या महा-पुरुषाची किमया! आज त्यांचा कीर्ति दुंदुभि भारतभर दुमदुमत आहे. या महापुरुषानें अशी ही लोकप्रियता कशाच्या बळावर मिळविली ? आज काल सर्व प्रकारच्या लोकांना म्हणजे गरीबांना व श्रीमंतांना, ज्ञानी व अज्ञानी लोकांना खालच्या नि वरच्या वर्गांतील लोकांना त्यांच्याबद्दल एवढा प्रेमादरभाव कां बरें वाटतो ? अशी कोणती जादू त्यांच्यापाशीं आहे बरें ? साईबाबा म्हणजे प्रेममूर्ती आहेत. सर्वांबद्दल त्यांना आत्यंतिक प्रेमभाव वाटतो. सर्वांबद्दल त्यांना कळवळा येतो. कोणाचीही अंतःकरणपेटी खोलायची असल्यास ती प्रेमरूपी चावीनें खोलावी लागते. ती प्रेमचावी त्यांच्याजवळ होती. वृंदावनांतील

गोपालकृष्ण आपल्या जवळच्या मंजुळ मुरलीरवानें सर्वांना आपल्याजवळ खेचून आणीत असे नाहीं का ? त्याचप्रमाणे शिरडींतील ह्या संतानें प्रेमबळाच्या व करुणेच्या बळावर असंख्य स्त्रीपुरुषांना आपल्यापाशीं खेचून आणिलें. त्यांनीं आपल्या भक्तांना अपरंपार प्रेम दिलें. त्यांच्या दैवी तेजानें जे जे त्यांच्या जवळ आले ते ते भारले गेले. ज्याला जें पाहिजे तें तें त्यांनी दिलें. त्यानीं भक्तांकडून जर कशाची अपेक्षा केली असेल तर ती म्हणजे 'तुम्ही माझी आठवण ठेवा म्हणजे मीही तुमची आठवण करीन.'

नाना प्रकारच्या दुःखतापांनीं पोळलेल्या जनतेपुढें त्यांनीं श्रद्धा आणि सबूरीच्या दोन गोष्टी ठेविल्या. किती बहुमोलाच्या आहेत त्या ! अगदीं सोप्यात-सोपी साधना दुःखानें गांजलेल्या जनतेपुढें त्यानी ठेविली आहे.

कधीं कधीं आम्हीं निराधार व निराश होऊन एखादें बालक जसें आपल्या मातेकडे आतुरतेनें नि आपुलकीनें मदतीसाठीं पहातें व आई त्याला प्रेमानें जवळ घेऊन कवटाळते, त्याचप्रमाणें बाबा आपल्या निष्ठावान् भक्ताकडे त्याच जिवाभावानें पहातात व भक्ताची इच्छा पूर्ण करतात. त्याला दुःखमुक्त करतात. एवढेंच नव्हे तर आपल्या दैवी शक्तीच्या बळावर आपल्या भक्ताच्या अंतरांत पावित्र्य व प्रेम उत्पन्न करून त्याला शाश्वत कल्याणाच्या मार्गाकडे घेऊन जातात.

श्रीसाईबाबा म्हणजे दयेचा महासागर. या देशांत पूर्वकाळीं जे थोर साधुसंत होऊन गेले त्या सर्वांत श्रेष्ठ अशी ही विभूति आहे. दुःखतापांनी व निराशेच्या चक्रांत सांपडून लोक पिळले जात असतां त्यांना आशेचा संदेश देण्यासाठीं व त्यांची दुःखतापापासून मुक्तता करण्यासाठीं हा महापुरुष या अवनीतळावर अवतीर्ण झाला. असंख्य लोकांना त्यानीं आपल्या कृपाछत्राखालीं घेऊन त्यांची दुःखमुक्तता केली आहे.

त्यानीं नानाप्रकारचे चमत्कार केले. ते केले ते भक्तांना दुःखखाईंतून तारण्यासाठीं; त्याना सुखसमाधानाच्या व व शाश्वत कल्याणाचा मार्ग दाखविण्यासाठीं. अनेक लोक नाना प्रकारच्या दुर्धर रोगांनीं पिडल्यामुळें त्यांच्याकडे आले. अनेकांना मानसिक व शारीरिक दुःखानीं सळो कीं पळो करून सोडलें होते. असे जे जे कोणी त्यांकडे आले ते सारे दुःखमुक्त होऊन

व कल्याणाचा मार्ग सांपडल्यामुळे आनंदित होऊन गेले. जे कोणी या जगांतील सुखदुःखानीं बांधले गेले आहेत व ज्यांना ऐहिक सुखसमृद्धि म्हणजेच सर्वस्व वाटतें अशा लोकांवरही या दयासागरानें आपल्या कृपेची पाखर घातली आहे.

लोकांच्या अडचणी दूर करायच्या, त्यांच्या गरजा दूर करायच्या, हें जणूं काय त्यांचें ब्रीद आहे. आणि या सर्वांच्या मागें जनतेंत अध्यात्मभाव वाढावा, जनतेनें चैतन्याचा गाभा जो भगवंत त्याच्या चरणांकडे लक्ष लावून आपलें शाश्वत कल्याण साधावें हीच भावना वास करीत असते. कारण बाबांची भक्तांकडे पहाण्याची एक विशिष्ट दृष्टि आहे. ते भक्ताच्या ऐहिक गरजा पुऱ्या करतात व त्याच्या अंतःकरणांत देवाधिदेवाकडे एकनिष्ठेने लक्ष लावण्याची भावनाही निर्माण करतात. तेव्हां सांगण्याचें काय ? बाबांची कृपादृष्टि ज्यांच्याकडे वळते त्यांच्यांत आस्तेकदम देवाधिदेवाबद्दलची भक्तिभावना उत्तरोत्तर वाढत जाते.

मानव जातीबद्दल व तिच्या कल्याणाबद्दल बाबांना आत्यंतिक काळजी. त्यांचें मानवजातीवर असीम प्रेम. त्या प्रेमाची तुलना करतां येणार नाहीं आणि त्याच हेतूनें बाबांनीं जनतेपुढें भक्तिभावाचा सुगम मार्ग ठेविला. तुम्हाला आनंद व शाश्वत सुखसमाधान हवें आहे ना ? मग भक्तीच्या मार्गानें जा. हा भक्तिपथ बाबांनी वाढीस लावला. असंख्य लोकांस सन्मार्गाकडे वळविलें. तुम्हीं माझी आठवण श्रद्धेनें व भक्तिभावानें करा. मी तुमच्या पाठीशीं सतत उभा आहे. तुमची चिंता वहाणारा मी आहें.' असे बाबांनीं आपल्या भक्तांना पवित्र वचन देऊन ठेविलें आहे.

१९१८ सालीं बाबांनीं जडदेहाचा त्याग केला. तो त्यांचा मृत्यू नव्हता, तर तें त्यांचें पुनरुत्थान होतें. कारण ते आमच्या दृष्टीसमोरून शरीरानें अदृश्य झाले असले तरी त्यांचें संकट निवारणाचें व भक्तिभाव प्रसाराचें कार्य अखंड चालूच आहे.

अशा या महापुरुषाचा पन्नासावा पुण्यतिथ्युत्सव सुवर्ण-ज्युबिली साजरी करण्याचें भाग्य आपल्या वाट्यास सद्भाग्यानें आलें आहे. तो महोत्सव त्यांच्या थोर कार्यास साजेशा दृष्टीनें साजरा करून आम्हीं आमचें पवित्र कर्तव्य पार पाडण्यासाठीं बद्धपरिकर होऊं या.

## सेवाभावी व शस्त्रकलानिपुण साईभक्त

# डॉ. पद्माकर भद्रे

152

### यांचा अल्प परिचय

लेखकः– पु. बा. कुलकर्णी

**श्रीसाईबाबा हे प्रेमाचे, निष्ठेचे नि सेवाभावाचे भुकेले आहेत. त्यांच्यावर निष्ठा ठेवणाऱ्याचें कल्याण व्हायचेंच. आमचे स्नेही कोल्हापूर येथील श्री साईसर्जरी हॉस्पिटलचे चालक-मालक डॉ. पद्माकर भद्रे हे बाबांचे एक निष्ठवान् भक्त आहेत. त्यांच्या कर्तबगारीचा हा आहे अल्प परिचय.**

" डॉक्टरसाहेब ! माझ्या गरीबाच्या घराला आपले पाय लागावे म्हणून केव्हांचा वाट पहात मी उभा आहे इथं ! "

" कां रे ? कोणी आजारी बिजारी आहे का घरीं ? "

" नाहीं साहेब ! मला आपण जीवदान दिलंय ना ! आपल्या उपकारांची फेड जन्मोजन्मीं नाहीं होणार मजकडून ! मी काय देणार ? माझ्या गरिबाच्या झोपडीला पाय लावून घोटभर चाय पिऊन गेलांत तर भारी आनंद होईल मला !

" एवढंच ना ? मग चल कीं ! "

कोल्हापूरापासून सुमारें तीस मैल अंतरावर असलेल्या भोजगावीं डॉ. पद्माकर भद्रे हे एका रोग्यास तपासण्यासाठीं गेले असतां परत जातांना त्या गावांतील एका शेतकऱ्यानें त्यांना वाटेंत अडविलें व त्याचवेळीं वरीलप्रमाणें उभयतांत संवाद होऊन डॉक्टर त्या शेतकऱ्याच्या समाधानासाठीं त्याच्या घरीं गेले.

त्या गरीब शेतकऱ्यानें मोठ्या प्रेमादरानें दिलेला चहा तितक्याच प्रेमानें घेऊन व त्याचे आभार मानून डॉक्टरसाहेब त्याचा निरोप घेऊन जाऊं लागले तेव्हां झोपडींतील एका कोपऱ्यांत असलेल्या देवस्थानाजवळ त्यांना नेऊन तो शेतकरी त्यांना म्हणाला, " ती पाहिलीत तुमची तसबीर ! माझ्या पांडुरंगावानी

वाटतां तुम्हीं ! म्हणून पांडुरंगाशेजारीं तिला बसविली आहे म्यां ! मी रोज तिला फुलं वहातों ! किती उपकार झाले आहेत तुमचे माझ्यावर ! भक्तिभावानें दोन फुलें त्या तसबिरीला वाहिल्याशिवाय मला जेवण गोड लागत नाहीं बघा!"

बोलतां बोलतां त्याचे डोळे पाणावले व कंठही भरून आला !

त्याच प्रेमभरांत स्मित हास्यपूर्वक त्याला व त्याच्या पांडुरंगाला प्रणाम करून डॉ. भद्रे यानीं त्या कृतज्ञ शेतकऱ्याचा निरोप घेतला.

डॉ. पद्माकर भद्रे यांनीं कोल्हापूर येथील आपल्या २०–२५ वर्षांच्या वास्तव्यांत डॉक्टरी कौशल्यामुळें, सौजन्यशील वागणुकीमुळें व गोरगरिबांबद्दल वाटणाऱ्या जिव्हाळयामुळें त्या भागांतील लोकांचीं मनें कशीं जिंकलीं आहेत, तसेंच कोल्हापूर व आसपासच्या भागांतील लोक त्याना किती चहातात, हें वरील लहानशा उदाहरणावरून दिसून येईल.

शस्त्रक्रिया, मग ती कितीही खडतर व गुंतागुंतीची असो; आजकाल ती त्यांच्या हातचा मळ होऊन राहिली आहे. त्या क्षेत्रांतील त्यांचा सिद्धहस्त सदा सर्वकाळ यशस्वी होऊन राहिला आहे. शस्त्रक्रियेची जरूरी असलेला व कोणत्याही रोगाने गांजलेला रोगी असो. डॉ. भद्रे हे त्याच्यासाठीं जिवाचें रान करतील. तोंडानें बोलण्याच्या कलेपेक्षां हातांनीं बोलण्याची कला त्यानीं चांगली हस्तगत केलेली आहे ! आपल्या व्यवसायांत त्यांनी सर्व बाजूंनीं परिपूर्णता मिळविली आहे. आपल्यापुढें आलेला रोगी कितीही बिकट व गुंतागुंतीच्या रोगानें पिडलेला असो, तो गरीब असो, वा श्रीमंत असो, त्याला शक्य त्या प्रयत्नांनीं रोगमुक्त करणें हें आपले पवित्र कर्तव्य जाणून त्याच्यासाठीं डॉक्टर प्रयत्नांची पराकाष्ठा करतील त्याला दुःख मुक्त करणें हेंच आपलें समाधान असें ते मानतात.

डॉक्टरी व्यवसाय म्हणजे रोगमुक्त करणारा, दुःखमुक्त करणारा व जीवदान देणारा, बहुमोलाचा भूतदयासंपन्न व्यवसाय. त्याचें पावित्र्य राखण्यासाठीं जितकें झटावें तितकें थोडेंच. माणुसकीला व सेवाभावाला या व्यवसायांत किती तरी वाव आहे.

सेवाभाव आणि माणुसकी ! किती मोलाचे दोन शब्द आहेत हे ! त्यांचा उच्चार त्यांच्याकडून कधींही व्हायचा नाहीं. त्या गुणांचा न बोलतां आचार मात्र त्यांच्याकडून अखंड चाललेला असतो.

डॉ. पद्माकर भद्रे यांचें करवीर नगरींत गेलीं सुमारें पंचवीस वर्षें वास्तव्य आहे. त्या कालावधींत लहानमोठ्या सुमारे १५।२० हजार शस्त्रक्रिया त्यांच्या सदा यशस्वी हातून पार पडल्या असतील ! त्यामुळें किती लोकांचे प्राण बचावले व किती स्त्रीपुरुषांचें असह्य जीवन सुखी व समाधानी झालें असेल, याची कोणीही सहज कल्पना करूं शकेल.

× × ×

डॉ. पद्माकर बाळकृष्ण भद्रे यांचा जन्म सातारा येथें १९१६ सालीं झाला. त्यांना बालपणींच मातृवियोग झाला. त्यांचें दुय्यम शिक्षण सातारा येथील न्यू इंग्लीश स्कूलमध्यें झालें आणि त्यानंतर ते पुणें येथील फर्ग्युसन कॉलेजांत दाखल झाले. चित्रकला हा त्या काळीं त्यांचा एक आवडता विषय होता. त्या क्षेत्रांत त्यांनीं पदार्पण केलें असतें तर त्यांतही त्यानीं नाव मिळविलें असतें; परंतु ज्या व्यवसायाचा मानवाच्या सुखदुःखाशीं निकट संबंध येतो, अशा व्यवसायाशीं त्यांचा संबंध जडावयाचा होता. आपणाला कांही तरी महत्तम कार्य करून दाखवावयाचें आहे व त्यासाठी झटून अभ्यास करणें व जरूर ती पूर्व तयारी करणें हेंच या काळातील आपलें एकमेव कर्तव्य आहे, अशा भावनेनें वागत असल्यामुळें वयोमानाबरोबर त्यांच्या हुषारीचें प्रमाण उत्तरोत्तर वाढत गेलें.

१९३५ सालीं मुंबईतील ग्रँट मेडिकल कॉलेजांत दाखल होऊन १९४१ सालीं ते एम्. बी. बी. एस्. ची डॉक्टरी परिक्षा मानसन्मानपूर्वक उत्तीर्ण झाले.

त्यांचे वडील सातारा येथील प्रसिद्ध वकील श्री. बाळकृष्ण नरहर भद्रे बी. ए. एल्. एल्. बी. व सि. जज्ज या नात्यानें महाराष्ट्रांतील अनेक भागांत आपली यशस्वी कारकीर्द पूर्ण करून अलीकडेच सेवानिवृत्त झालेले त्यांचे चुलते श्री. रामचंद्र नरहर भद्रे बी. ए. एल्. एल्. बी. या उभयतांचेंही त्यांच्या शिक्षणाकडे बारकाईनें लक्ष होतें. त्यांनीं त्यांस शक्य तेवढें उत्तेजन दिलें व त्यांच्या शिक्षणाची परोपरीनें काळजी वाहिली.

डॉक्टरीची परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर अनुभवजन्य ज्ञानासाठीं मुंबईतील जी. टी. हॉस्पिटलमध्यें व दादर–माटुंगा भागांतील कॉलनी नर्सिंग होममध्यें त्यानीं एकेक वर्ष घालविलें. दोन्हीं ठिकाणी त्यांना मार्गदर्शक व प्रवीण डॉक्टरांचें

सान्निध्य लाभलें; त्याचप्रमाणें त्या काळांत नाना प्रकारच्या शस्त्रक्रियाही त्यांच्या हातून यशस्वीरीतीनें पार पडल्या.

१९४३ साली कोल्हापूर येथील स्टेट हॉस्पिटलमध्यें त्यांची नेमणूक झाली. डॉ. रेगे हे कुशल डॉक्टर त्यावेळीं तेथें चीफ मेडिकल ऑफिसर होते. त्यांच्या नेतृत्वाखालीं काम करीत असतां डॉ. भद्रे यांना नाना प्रकारच्या शस्त्र-क्रिया हाताळण्याची भरपूर संधी मिळाली. प्रत्येक शस्त्रक्रिया आत्यंतिक सावधा-नतेनें व काळजीपूर्वक हाताळावयाची; त्यांत काडीभरही कुचराई करावयाची नाहीं; 'योगः कर्मसु कौशलम्' हें होतें त्यांचें ब्रीदवाक्य. पुढें तीच संवय हातांना लागत गेली. तो त्यांचा एक बलवान गुण बनला.

या हॉस्पिटलमध्यें असतां त्यांनीं शस्त्रक्रियेंतील प्राविण्यदर्शक अशा एम्. एस. ( मास्टर ऑफ् सर्जरी ) व एफ्. सी. पी. एस. या दोन कठीण परिक्षा देऊन त्या दोन्हींतही त्यांनीं यश संपादिलें.

या शस्त्रक्रियेच्या क्षेत्रांत प्लास्टिक सर्जरी म्हणजे 'रुपदायक शस्त्रक्रिया' या नावानें ओळखला जाणारा एक महत्त्वाचा भाग गेल्या कांहीं वर्षांपासून जगापुढें आलेला आहे. त्याचे महत्त्व शब्दांनी वर्णन करणें कठीण आहे. गेल्या दुसऱ्या महायुद्धांत रणांगणावर अनेक लोक जखमी व विद्रुप झाले. अनेकांच्या ठिकाणी शारीरिक व्यंगें निर्माण झालीं. कोणाचें नाक गेलें, कोणाचे कान गेले तर कोणाच्या ओठाची चिरफाड झाली. या अशा व्यंगांमुळें मनुष्याला तोंड बाहेर दाखविण्याची किंवा बाहेर हिंडण्याफिरण्याची सहाजिकच लाज वाटूं लागते. महायुद्धांत ज्यांच्या वाट्यास अशा प्रकारची व्यंगें आलीं, त्यांचीं तीं व्यंगें रूपदायक शस्त्रक्रियेच्या द्वारें दूर करून त्यांना पुनरपि माणसांत आणण्यांत आलें.

विद्रूप चेहऱ्यावर सुरूपता आणणारी ती 'रूपदायक शस्त्रक्रिया.' अशा प्रकारच्या शस्त्रक्रियेंत डॉ. पद्माकर भद्रे प्रवीण झाले आहेत. आपल्याकडे महायुद्ध झालें नसलें तरी तंटेभांडणांचीं छोटीं युद्धें कुठें ना कुठें होतच असतात कीं नाहीं? कोणी नवरदेव रागाच्या भरांत आपल्या पत्नीचें नाकच छाटून टाकतो ! कोणाचे ओठ जन्मतःच फाटलेले किंवा विद्रूप झालेले असतात अथवा अपघातामुळें त्यांना विद्रूपता येते. अशा प्रसंगीं त्या माणसाच्याच शरिरांतील मांसाचा जरूर तेवढा तुकडा काढून त्याचा उपयोग व्यंग दूर करण्यासाठीं करावयाचा.

अपघातामुळें किंवा नवरदेवाकडून घडलेल्या अत्याचारामुळें एखाद्या बाईचें नाक नाहींसें होणें ही केवढी भयंकर शिक्षा आहे तिला ! नाकच नाहीं मग तें तिनें वर कसें करायचें ?

परंतु डॉ. पद्माकर भद्रे यानीं रूपदायक शस्त्रक्रियेच्या सहाय्यानें आजवर अनेक स्त्रीपुरुषांचीं शारीरिक व्यंगें नाहींशीं करून त्यांचें जीवन सुखासमाधानाचें केलें आहे.

कोल्हापूरच्या जवळपास रहाणाऱ्या एका गृहस्थानें रागाच्या भरांत आपल्या बायकोचें नाक कापून त्याचा दर्शनी तुकडाच उडविला ! त्यामुळें त्या बाईचा काय अवतार झाला असेल, याची आपण चांगली कल्पना करूं शकतां ! या क्रूरपणाबद्दल नवऱ्याला शिक्षा होऊन तो तुरुंगांत जाऊन बसला आणि नाक बेपत्ता झाल्यामुळे लोकलज्जेखातर त्या दुर्दैवी बाईला घरांतल्या घरांत स्वतःला कोंडून घ्यावें लागलें ! परंतु हा तोंड बांधून बुक्क्यांचा असह्य मार तिनें किती दिवस सहन करायचा ?

कोणाच्या तरी सल्ल्यावरून ती बाई डॉ. पद्माकर भद्रे यांच्यापुढें आली. त्यानीं रुपदायक शस्त्रक्रियेच्या (प्लास्टिक सर्जरी) सहाय्यानें पूर्ववत् तिच्या नाकाची जागच्या जागीं स्थापना करून देऊन तिला माणसांत आणून सोडली ! अशा रीतीनें किती तरी व्यंग स्त्रीपुरुषांस त्यांचीं शारीरिक व्यंगें नाहींशी करून त्यानीं सुखी नि आनंदी केलें आहे.

सुमारें १५–१६ वर्षें वयाच्या एका दुःखी मुलीची दुर्दैवी कहाणी येथें नमूद करावीशी वाटते. ती नेहमीं दुःखी कष्टी असायची. तिला काय होत आहे हें तिला तसेंच तिच्या आई–वडिलासही समजेना. शेवटीं मोठ्या आशेनें तिला डॉ. पद्माकर भद्रे यांच्याकडे आणण्यांत आलें. त्यांनी तिची अचूक पहाणी व तपासणी करून तिच्यावर शस्त्रक्रिया केली ! निर्णय काय लागला ? त्या मुलींतून एका मुलाची निर्मिती झाली ! तिला पुरुषत्व प्राप्त झालें. त्याच बरोबर तिला आरोग्याचाही लाभ झाला ! केवढें हें कौशल्य !

गडहिंग्लज येथील एका बाईचें पोट दिवसेंदिवस फुगत चाललें होतें. ती गरोदर असावी, अशी घरच्या व शेजारच्या लोकांची खोटी कल्पना ! आणि अशा स्थितींत २।३ वर्षें हां हां म्हणतां निघून गेलीं ! शेवटीं डॉ. भद्रे यानीं

तिच्या पोटावर यशस्वी शस्त्रक्रिया करून पोटांतून सदतीस पौंड वजनाचा गोळा (ट्यूमर) बाहेर काढला! शस्त्रक्रियेच्या क्षेत्रांतील अशा प्रकारच्या चमत्कृतिजनक घटना त्यांच्या हातून आजवर किती तरी घडलेल्या आहेत. त्या कुठवर सांगाव्या?

आपल्या या शस्त्रकला नैपुण्याचा फायदा गोरगरिबांस करून देऊन ते त्यांचा दुवा मिळवित आहेत हें विशेष होय. कोल्हापूर व बावडा येथील सरकारी हॉस्पिटल्समधून काम करीत असतां जे जे रोगी त्यांच्याकडे आले त्यांना आपल्या डॉक्टरी कौशल्यानें व सौजन्यानें त्यांनीं भारून टाकिलें. अशा रीतीनें त्यांची लोकप्रियता उत्तरोत्तर वाढत चालली होती. आपल्या गुणांनीं त्यांनीं कोल्हापूरवासीयांस एक प्रकारचें वेड लावलें होतें; इतक्यांत सरकारनें वीसनगर येथील गिरधरलाल परेख हॉस्पिटलमध्यें त्यांची बदली केली. वीसनगर येथील धनिक व्यापाऱ्यांनीं लक्षावधि रुपये खर्चून आधुनिक उपकरणांनीं व सर्व प्रकारच्या सुखसोयींनीं सुसज्ज असें हॉस्पिटल बांधून एखाद्या प्रवीण व शस्त्रकलानिपुण अशा डॉक्टरची सरकारकडे मागणी केली व त्यामुळें करवीरवासीयांच्या सेवेस कांहीं काळ डॉ. भद्रे यांस मुकावें लागलें.

डॉक्टर वीसनगर येथें आले व अगदीं वेगळ्या वातावरणांत वावरूं लागले. भाषा वेगळी, माणसें वेगळीं व सारेंच वेगळें होतें; परंतु त्या विभिन्न वातावरणाशीं हां हां म्हणतां ते समरस झाले. आपल्या चार महिन्यांच्या मुक्कामांत त्यांनीं तीनशें शस्त्रक्रिया यशस्वी रीतीनें पार पाडल्या. त्या भागांतील गुजराथी जनतेला आपला प्राणदाता भेटला असें वाटूं लागलें. या प्राणदात्याला कोणत्याही प्रकारें उणें पडूं नये व त्यांचें वास्तव्य सुखाचें व्हावें, म्हणून प्रत्येकजण परोपरीनें त्यांच्यासाठीं झटूं लागला.

परंतु डॉक्टरसाहेबांच्या मनाला स्वस्थता कुठें होती? ज्या करवीरच्या कर्मभूमींत आपण अनेक वर्षें घालविलीं व जेथें हजारों लोकांशीं स्नेहसंबंध जोडिले, त्यांच्या सेवेची ओढ त्यांना तीव्रतेनें लागून राहिली होती.

तसेंच सरकारी बंधनांतून मुक्त होऊन आपण स्वतंत्र व्यवसाय थाटावा असेंही त्यांना वाटूं लागलें होतें; परंतु ती कांहीं सहजसाध्य गोष्ट नव्हती. तें एक मोठे धाडस होतें; त्याचप्रमाणें त्यांच्या लोकप्रियतेची व कर्तृत्वशक्तीची ती

एक कसोटी ठरणार होती. कसेंही असो. स्वतंत्रपणें व्यवसाय चालविण्याचे धाडस डॉ. भद्रे यानीं शेवटीं पत्करलें. मनाचा निर्धार करून त्यांनीं सरकारी नोकरीचा राजीनामा पाठविला व पुनश्च ते आपल्या कर्मभूमींत येऊन दाखल झाले. करवीरांत त्यांचे स्नेही व चाहते त्यांच्या स्वागताला तयारच होते. डॉक्टरसाहेबांचा मनोदय सर्वांनी आनंदाने उचलून धरिला.

शस्त्रक्रिया, शुश्रूषा व प्रसूति यांसाठीं स्वतंत्र हॉस्पिटल काढण्याच्या उद्योगास डॉक्टर लागले. त्यावेळीं त्यांच्या मार्गांत कोणतीही अडचण येऊं नये यासाठीं झटणारीं व वाटेल तें सहाय्य करण्यासाठीं अहमहमिकेनें पुढें सरसावणारीं करवीर नगरींतील अनेक माणसें त्या वेळीं पुढें आलीं; व साई सर्जरी या नावानें सातारचे कर्मवीर श्री. भाऊराव पाटील यांच्या अध्यक्षतेखालीं त्याच जिल्ह्यांतील ना. यशवंतराव चव्हाण ( सध्यांचे भारत सरकारचे गृहमंत्री ) यांच्या हस्तें नवीन हॉस्पिटलचें उद्घाटन कोल्हापूर येथें ता. २७ एप्रील १९५४ रोजीं मोठ्या थाटांत पार पडलें. त्या अभिनंदनीय घटनेला आतां १३।१४ वर्षें होत आलीं.

प्रस्तुत लेखक मित्रत्त्वाच्या नि ऋणानुबंधाच्या नात्यानें त्या समारंभास हजर होता. समारंभ मोठ्या थाटांत पार पडला. त्यावेळीं ऐन समारंभांत एकाएकीं पर्जन्यवृष्टि होऊन जलसिंचनाच्या रूपानें भगवंतानें त्यांना कसा शुभाशीर्वाद दिला, त्याची मधुर स्मृति अजूनही लेखकास आहे. त्यानंतर अनेक पावसाळे आले नि गेले व ते डॉक्टरसाहेबांच्या उत्कर्षांत उत्तरोत्तर मोलाची भर टाकीत गेले.

उपरोक्त समारंभांत आपल्या आशीर्वादपर भाषणांत कर्मवीर भाऊराव पाटील म्हणाले होते कीं, " डॉ. पद्माकर भद्रे यांस बालपणीं मी अंगाखांद्यावर खेळविलें आहे. ते आमच्या सातारचे म्हणून मला त्यांच्याबद्दल विशेष अभिमान वाटतो. लहानपणीं ज्यांना मी खेळविलें ते सारे या जगांत भाग्यवान् ठरले आहेत. त्याचप्रमाणें डॉ. भद्रे हेही भाग्यवान ठरतील अशी मला खात्री वाटते. मी त्यांना एकदां म्हणालों होतों कीं, तुम्हांला आपल्या विद्येचें चीज करावयाचें असेल व मनाप्रमाणें जनतेची सेवा घडावी अशी इच्छा असेल तर सरकारी बंधनाची बेडी ताडकन् तोडून मोकळे व्हा आणि मग पहा काय चमत्कार होतो तो ! "

त्या भविष्यवाणीला आतां चौदा वर्षें होत आलीं. येथें नमूद करण्यास आनंद वाटतो कीं, या दीर्घकालावधींत कर्मवीर भाऊरावांचें तें भविष्य तंतोतंत खरें ठरलें आहे. तो चमत्कार घडून आलेला आहे. 'साई सर्जरी' हॉस्पिटलचा पसारा उत्तरोत्तर वाढत चालला आहे. आजकाल अनेक रोग्यांचें नि भगिनींचें तें खात्रीचें माहेरघर होऊन राहिलें आहे.

एकादें हॉस्पिटल यशस्वी रीतीनें चालविणें ही साधी गोष्ट नाहीं. एकटे डॉक्टर किती ठिकाणीं लक्ष पुरविणार? परंतु सुदैवानें सौ. नंदिनी यांच्या-सारख्या कर्तबगार, पदवीधर व सर्व बाजूकडे दक्षतेनें लक्ष पुरविणाऱ्या संघटना-कुशल पत्नीचा लाभ त्यांना झालेला आहे. देखरेखीची, पथ्यपाण्याची व इतर बहुतेक जबाबदारी त्या संभाळतात व त्यामुळें डॉक्टरसाहेबांवरील किती तरी भार हलका झालेला आहे.

डॉ. पद्माकर भद्रे यांच्या सेवाभावाचें क्षेत्र दिवसेंदिवस वाढत चाललें आहे. अंगीकृत कार्यावर पूर्ण निष्ठा असली व आपण स्वीकारलेलें सेवाव्रत हीच ईश्वरभक्ति अशी श्रद्धा असली म्हणजे ईश्वर तुमच्या आवडीनिवडी पुरवितो नि तुमच्या हाताला यश देतो.

डॉक्टरसाहेबांचा स्वभाव अत्यंत मितभाषी, परोपकारी व दुसऱ्यासाठीं वाट्यास येईल तो त्याग करण्यास नेहमीं तत्पर, असा आहे. स्वभावांतील गोडव्यामुळें व सौजन्यशीलतेमुळें लहानापासून थोरांपर्यंत अनेकांशीं त्यांचा जिव्हाळ्याचा संबंध आहे. आपला व्यवसाय आणि आपण; इतर भलत्यासलत्या बाबतींत वृथा ढवळाढवळ करणें, त्यांना आवडत नाहीं.

डॉ. पद्माकर भद्रे यांचा, गेल्या दोन तपांतील कर्तबगारीचा हा अल्प परिचय आहे. जीवन ही एक अखंड तपस्या आहे. या तपस्येनें आम्हीं भगवंताला आळवायचें. त्याच्याशीं जवळीक साधायची आहे. आयुष्यांत जी भूमिका एकदां स्वीकारली किंवा जो व्यवसाय वाट्यास आला, त्याचा जास्तींत जास्त सदुपयोग जनताकल्याणासाठीं सेवाभावानें करून त्या व्यवसायाची शोभा व प्रतिष्ठा वाढविणें हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे. या कर्तव्याचें पालन हीच देवपूजा. डॉ. पद्माकर भद्रे यांच्याकडून त्या पवित्र कर्तव्याचें पालन होत आहे. त्यामुळें त्यांचा भविष्यकाळ सध्यांपेक्षांही उज्वल व वैभवशाली आहे, असें वाटल्याशिवाय रहात नाहीं.

डॉ. पद्माकर भद्रे यांच्यावर श्री साईबाबांची कृपा आहे. शिरडी येथील पवित्र पादुका स्थानाच्या भेटीची ओढ त्यांना नेहमी लागून राहिलेली असते. त्या महात्म्यावरील त्यांची निष्ठाही तशीच अनन्यसाधारण आहे. त्यांचें संसारी जीवन सुखी नि आनंदी वातावरणानें भरलेलें आहे. त्यांना कर्तबगार पत्नीचा लाभ झालेला आहे. त्यांची सुकन्या कु. मीना ही एम्. बी. बी. एस. परिक्षेंत मानसन्मानपूर्वक उत्तीर्ण झाली असून सध्या एम्. डी. परिक्षेच्या तयारींत आहे. चिरंजीव महाविद्यालयीन शिक्षण घेत आहे.

कोल्हापूर ही डॉ. भद्रे यांची आवडती कर्मभूमि. तेथील असंख्य लोकांना त्यांनीं आपल्या सौजन्यानें, सेवाभावानें नि परोपकारी वृत्तीनें भारून टाकिलें आहे. त्यांच्या या सेवाभावाचें फळ बाबांनीं त्यांना दिलें आहे. या मे महिन्यांत स्वतःसाठीं बांधलेल्या सुंदर व टुमदार वास्तूंत ते प्रवेश करीत आहेत ही त्यांच्या जीवनांतील एक महत्त्वाची घटना होय. यापुढील काळांत त्यांच्या सेवाक्षेत्राची उत्तरोत्तर अधिकाअधिक वाढ होत जावो नि लोकसेवेसाठीं साई बाबा त्यांना सुखासमाधानाचें दीर्घायुरारोग्य देवोत, हीच या शुभ प्रसंगीं त्यांच्या चरणीं आमची प्रार्थना आहे.

---

—भगवंत हेंच माझें सर्वस्व असें समजून जो साधक सर्व प्रकारें त्याचाच होतो, त्याचा आचार–विचार कसा काय आहे, त्याची जात-पात कोणती, तो उच्च आहे कीं नीच आहे, यासंबंधीं विचार न करतां भगवंत त्याला जवळ करतो. त्याचा असा हा महिमा लक्षांत घेऊन आपण त्याला सर्वप्रकारें शरण गेलें पाहिजे.

# नामसाधनेचें महत्त्व

लेखक : प्रा. के. वि. बेलसरे

(लेखांक ३ रा)

**या लेखांत नामसाधनाचें वैशिष्ट्य काय, त्याचप्रमाणें नामसाधनेंतील विविध अनुभव, नामसाधनेमुळें आस्ते आस्ते मनाचें पावित्र्य कसकसें वाढत जातें व नामसाधनेचें स्वरूप काय यासंबंधानें सुबोध स्पष्टीकरण करण्यांत आलें आहे.**

सामान्य प्राप्रंचिक माणसांना सहज झेपेल असा भगवंताच्या दर्शनाचा उपाय पुढील लक्षणांनीं संपन्न पाहिजे. देहाला कष्ट न देणारा, परिस्थितीमध्यें उलथापालथ न करणारा, पैशाला व लौकिकाला धक्का न लावणारा, निकट नातेवाईकांचे प्रेमसंबंध कायम ठेवणारा, सामान्य इच्छा तृप्त करण्याच्या आड न येणारा, जगांतील ऐश्वर्य व सुखें कायम ठेवून देव जोडून देणारा, कोणत्याही स्त्री-पुरुषांना कोणत्याहि परिस्थितींत करतां येणारा, मनाच्या कोणत्याहि अवस्थेंत आचरतां येणारा, निश्चित फळ देणारा, धोके अगदीं कमी असणारा आणि श्रुतिशास्त्रांना व थोर साधूसंतांना मान्य असणारा असा भगवंताच्या प्राप्तीचा उपाय असावा. हीं सर्व लक्षणें नामाच्या ठिकाणीं प्रकर्षानें आढळतात. नाम घेण्याला देहाचे कष्ट नाहींत. नाम घेण्याला सध्याच्या परिस्थितीमध्यें यत्किंचित बदल करण्याचें कारण नाहीं. नामाचा आणि पैशाचा व लौकिकाचा सुतराम् संबंध नाहीं. जें नाम अत्यंत श्रीमंताला तेंच नाम अत्यंत गरिबाला घेतां येतें. जगांत नामाइतकी अभेदानें वावरणारी दुसरी वस्तु नाहीं. प्रपंचांतील निकट संबंध देहापुरते मर्यादित असल्यानें ते नामाच्या आड येऊं शकत नाहींत. तसेंच नाम त्यांच्या आड येत नाहीं. खाण्यापिण्याच्या, कपड्यालत्त्यांच्या, दागिन्यांच्या, सामान्य माणसांच्या ज्या इच्छा नीतिधर्माला धरून असतात त्या तृप्त करण्यास नाम आड येत नाहीं. उलट नामाच्या सत्तेनें त्या आपोआप क्षीण होत जातात.

एखादा नामधारक ऐश्वर्यात राहील तर एखादा गरिबींत राहील. श्रीमंताला ऐश्वर्याचा अभिमान राहणार नाहीं, तर गरिबाला दारिद्र्याचें दुःख राहणार नाहीं. देह प्रारब्धानें श्रीमंती वा गरिबी भोगतो असें दोघेहि मनांत ओळखून वागतात. सर्व स्त्रीपुरुषांना सर्व कालीं, सर्व स्थळीं, सर्व प्रकारच्या परिस्थितीमध्ये अविरोधाने नामसाधन करतां येतें. परिस्थितीचा संबंध देहापुरता असल्यानें प्रतिकूल परिस्थिमध्येंदेखील मन नामांत गुंतवतां येतें. मनाच्या सर्व अवस्थांमध्यें—गाढ झोपेंमध्यें, बेशुद्धीमध्यें आणि समाधीमध्येंसुद्धा—नाम चालू ठेवतां येतें. नाम आणि नामी म्हणजे ओंकाररूप असलेला भगवंत यांच्यामध्यें अभेद आहे. अर्थात नाम चालतें तेथें भगवंताला राहिल्याशिवाय गत्यंतर नसतें. इतकेंच नव्हे तर जेथें नाम तेथें भगवंत आणि तेथें भगवंतभक्त किंवा संत असा अतूट त्रिवेणीसंगम अनुभवास येतो. म्हणून नामासारखें निश्चित फळ देणारें दुसरें साधन नाहीं. व्यवहारिक परिस्थितीशीं नामाचा तसा संबंध येत नसल्यानें नाम घेतांना प्रपंच आपल्या मार्गानें जात राहतो. त्यामुळें नामसाधनेमध्यें धोक्याचा प्रश्नच उरत नाहीं. शिवाय इतर साधनांमध्ये प्रगति लवकर झाल्यासारखी दिसते हें खरें. पण उलटून घसरण्याचें भय अगदीं शेवटपर्यंत राहातें हेंहि तितकेंच खरें. नामसाधनेंत हळुहळू प्रगति झाल्यानें माणसाचें मन अगदीं मुळापासून सर्व बाजूंनीं सुधारतें आणि जेवढी सुधारणा घडते तेवढी कायमची पदरांत पडते. परमात्मा सगुणांत आल्यापासून म्हणजे प्रणवरूपानें प्रकट झाल्यापासून नामसाधनेस आरंभ झाला. श्रुतीला, सर्व शास्त्रांना, सर्व पुराणांत आणि सर्व थोर आत्मज्ञानी साधुसंतांना नामसाधना मान्य आहे. किंबहुना एखादा साधु पक्व आहे कीं नाहीं हें ठरविण्यास नामाविषयीं तो काय सांगतो, तें पाहणें हा खात्रीचा उपाय आहे.

### ६. नामसाधनेंतील अनुभव :

कोणतेंहि साधन करूं लागल्यावर आपली प्रगति होत आहे कां नाहीं हें पाहण्याची जिज्ञासा निर्माण होणें स्वाभाविक आहे. वस्तुस्थिति आणि ध्येयस्थिति यामध्यें नेहमीं अंतर असतें. वस्तुस्थिति मूर्त, दृश्य व साकार असते तर ध्येयस्थिति अमूर्त, अदृश्य व निराकार असते. अर्थात् वस्तुस्थिति आणि ध्येयस्थिति यांमधील अंतर कमी होत जाऊन वस्तुस्थितीला ध्येयस्थितीचा आकार येत जाणें याचें नांव प्रगति होय. ध्येयाकडे अधिकाधिक सरकणें याचें नांव

प्रगति. भगवंताचें दर्शन, आनंदाचा, शांतीचा म्हणजेच समाधानाचा साक्षात् अनुभव हें नामसाधनेचें ध्येय आहे. भगवंत अत्यंत सूक्ष्म आणि हृदयांत खोल ठिकाणीं असल्यानें बाहेरचें लक्ष आवरून आंतमधें आपण जितकें अधिक रमूं लागूं तितकें अधिक आनंदाजवळ जाऊं. आनंदब्रम्हाला नाम असें म्हणतात. म्हणून नाम अधिकाधिक घ्यावेंसे वाटणें, नामांत मन रंगूं लागणें किंवा नामाशिवाय जिवाला चैन न पडणें हाच नामाचा खरा अनुभव समजावा. नामाला ज्यानें मनापासून घट्ट धरलें त्याचें अंतरंग व बहिरंग नामानें भरून जातें. त्याच्या अंतरांत घर करून राहिलेली आणि असमाधान निर्माण करणारी वासना नामानें आपोआप क्षीण होत जाऊन नाहींशी होते. नाम घेणाऱ्या माणसाच्या अंतरंगांत आमूलाग्र बदल होऊन तो दिव्य माणूस बनतो. म्हणून हृदयामधें नामाचा प्रकाश वाढत जाणें आणि त्यामुळें भगवंताचें आनंमदय स्वरूप अधिकाधिक प्रकट होत जाणें हा नामाचा खरा अनुभव आहे. नाम म्हणजे भगवंताची शारदारूपी चिच्छक्ति होय. भगवंताचीच शक्ति असल्यानें नाम स्वयंप्रकाश आहे, या कारणानें नामाची संगत धरल्यावर अंतःकरणांतील वासनेचा अंधकार आणि देहबुद्धीचा भ्रम दोन्हीहि नाहींशीं होऊं लागतात. नामधारकाला प्रथम वस्तूंबद्दल समाधान वाटूं लागतें. सर्व वस्तूंमध्यें पैसा मुख्य असल्यानें आपल्या सांपत्तिक स्थितीबद्दल असमाधान त्याला वाटेनासें होतें. हा पहिला अनुभव लक्षांत धरण्यासारखा आहे. नामाचा अभ्यास चालू ठेवला असतां प्रपंचांतील आघातांचें भय कमी होत जातें आणि देहाच्या सुखदुःखाविषयीं उदासीनता येते . नामाचा हा अनुभव अधिक श्रेष्ठ मानला आहे. नामाचा अभ्यास तसाच पुढें चालू ठेवला तर कामक्रोधादि विकार ताब्यांत येतात आणि चित्ताला शांतता येऊं लागते. देहसुखांपैकीं कामतृप्तीचें सुख माणसाला अति मोहून टाकतें, कामवासना ही एक जीवनोपयोगी शक्ति आहे. नामाच्या अभ्यासानें तिचें रूपांतर आध्यात्मिक शक्तीमध्यें घडून येतें आणि साधकाला स्वतःच्या देहाकडे वेगळेपणाने पहाण्याची कला साधते. मन नामांत रंगूं लागल्यानें देहाचा थोडा थोडा विसर पडतो. देहाची गति प्रारब्धाधीन असते, अशी प्रचीति आल्याने देह गादीवर लोळला काय किंवा चिखलांत लोळला काय, खरा नामधारक त्याच्याकडे साक्षित्वानें पाहतो. हा मोठा श्रेष्ठ अनुभव असून यामध्यें डोळ्यांशिवाय प्रकाश दिसतो, कानांशिवाय नाद ऐकूं येतो, नाकाशिवाय सुगंध येतो आणि

जिभेशिवाय दिव्य रस चाखता येतो. मनाला चांगली सूक्ष्मता आल्याने तें विशाल बनतें आणि दुसऱ्याच्या मनांतील विचार कळणें, भविष्य कळणें इत्यादि अनुभव आपोआप येऊं लागतात. यानंतर इतर गोष्टींना न फसतां मनाचा अभ्यास चालू ठेवला तर नामधारक नामाच्या इतका ताब्यांत जातो किं, तें त्याला अनावर होतें, हृदयांत अति खोल गेलेलें नाम स्वप्नांत आणि गाढ झोपेतदेखील अखंड चालू राहातें. सबंध शरीरांतून, नसानसांतून व मनांतून अहोरात्र नामाचा सूक्ष्म ध्वनि चालू राहतो. देहाचें पूर्ण विस्मरण होऊन नामधारक आत्मानंदामध्यें आपणाला विसरून जातो. आपण कोठें आहोंत, कोणत्या अवस्थेत आहोंत याचें स्मरण टिकविणें कठिण जातें. सर्व इंद्रियांमधून आंतील आनंद उसळून वाहूं लागतो. आत्मानंदामधें धुंद झाल्यानें 'चिदानंदरूपः शिवोऽहं शिवोऽहं' ही साक्षात् प्रचीति त्याला येते. ही अवस्था काहीं काल भोगल्यावर आपोआप शांत होते. नामाचा हा सर्वोत्तम अनुभव होय.

नामधारकानें मनापासून नाम घेतल्यास त्याच्या अंतरंगाची हळुहळू वाढ होते. आणि वरील अनुभव आपोआप येतात. नाम घेत गेल्यानें अंतःकरणांत देव भरतो. देव भरून तेथें स्थिर झाला म्हणजे बाकीचे विकार–विचार स्वाभाविकपणें नाहींसे होतात. समाधान वाढत चाललें, प्रसंगामधें मन शांत राहूं लागलें कीं नाम पचनीं पडूं लागलें असें नक्की समजावें. देहदुःख अंगावर आदळलें तरी नामांत खंड न पडतां आपला आनंद सहज टिकणें हा नामाचा खरा अनुभव होय. नाम घेऊं लागल्यावर प्रपंच सुधारण्याच्या दृष्टीनें त्याचा अनुभव पाहणें यासारखा आचरटपणा नाहीं. नाम इतकें पवित्र, दिव्य, रसमय, विशाल आणि वासनेपासून अलिप्त आहे कीं जो मनुष्य नामाची कास धरतो व नामाला वाहून घेतो तो मनानें तसाच बनतो. परमानंद भोगायला मिळणें हा नामाचा मुख्य अनुभव आहे.

**७ नामसाधनेचें स्वरूप :**

सच्चिदानंदस्वरूप भगवंताशीं अनन्य होऊन जिवाचा शिव बनणें, आनंद व समाधान यांनीं जीव आंतबाहेर भरून वाहणें हें नामसाधनेचें पर्यवसान आहे. आनंदाचा अनुभव येण्यास मन लायक झालें पाहिजे आणि तसें लायक झालेलें

मन रहाण्यास देह तयार झाला पाहिजे. याचा अर्थ असा कीं, नामसाधनेस आरंभ केल्यावर देहाची शुद्धि होऊन मनाचें सध्याचें स्वरूप हळहळ बदलत गेलें पाहिजे. भगवंतापासून दूर करणारी देहबुद्धि हळहळ नाहींशी होऊन तिच्या ठिकाणीं देवबुद्धि प्रकट होत जाणें हें नामसाधनेचें मर्म आहे. देवबुद्धि म्हणजे भगवंताच्या अस्तित्वाची जाणीव, जशी प्रकट होत जाईल तशी वासना आपलें मूळ हिडिस व स्वार्थी स्वरूप टाकून भगवंताला शोभेल असें शुद्ध व निःस्वार्थी स्वरूप धारण करते. बाहेरच्या जगामध्यें काय किंवा अंतरंगामध्यें काय, दोन शक्तींचा संघर्ष चालू असतो. भगवंताकडे नेणारी शक्ति नामाकडे मनाला खेचीत असते तर भगवंतापासून दूर करणारी शक्ति म्हणजे वासना मनाला उलट दिशेनें खेचीत असते. या संघर्षामध्यें आपण निश्चयानें नामाच्या बाजूला राहिलों तर वासनेचा जोर हळुहळू कमी होत जातो. आपल्या मनांत जोंवर वाईट विचारांचें बीज असतें तोंवर आंतून घातक विचार निर्माण होतात यांत नवल नाहीं. पण जगांत वावरणारे वाईट प्रवाह जोरानें आपल्या मनांत आकर्षिले जातात. नामसाधनेमध्यें या आंतील आणि बाहेरील विरुद्ध विचारांना अडवून धरून नाम कायम ठेवण्यास साधकाला मोठेच कष्ट पडतात. निश्चयानें, संतांच्या सहवासानें, विवेकानें आणि सद्‌गुरूच्या कृपेनें नामाचा अभ्यास अखंड चालू ठेवला तर या संघर्षावर मात करतां येते. मनाची शक्ति हळुहळू वाढत गेल्यानें घातक विचारप्रवाहांना वेळींच बांध घालून साधनांतील विक्षेप टाळतां येतो. यावरून एक गोष्ट स्पष्ट होईल कीं नामाचे परिणाम अंतरंगांतील म्हणजे सूक्ष्मांतील असतात. त्याच कारणानें नामसाधनेच्या वेगवेगळ्या पायऱ्या नसतात. नामसाधना फार अनुस्यूत म्हणजे अखंड असा चढणीचा मार्ग आहे. नामाच्या अभ्यासानें नामसाधना आरंभ पावते. अभ्यासानें नामाचा सहवास घडूं लागतो. सहवासांतून नामाबद्दल आवड निर्माण होते. आवडीनें नाम घेत गेल्यानें भाव प्रकट होतो. भाव म्हणजे भगवंताच्या अस्तित्वाची जाणीव. भाव दृढ झाला कीं निष्ठा उदय पावते. निष्ठेमध्यें निश्चय, शरणागति आणि त्याग करण्याची तयारी असते. निष्ठा पक्क

झाली म्हणजे तिचें रूपांतर प्रेमामध्यें घडतें. म्हणजे तन्मयता किंवा अनन्यता होय. अनन्यता आणि भगवंताचें दर्शन दोन्हीं एकाच अनुभवाचीं नांवें आहेत. नामाच्या अभ्यासापासून ते अनन्यतेपर्यंत नाम कायम असतें, इतकेंच नव्हे तर तें अधिक अधिक मनांत खोल जाऊन शेवटीं सहज स्वभाव बनून जातें. आपल्या प्राणाइतकें नामाचें प्रेम निर्माण होणें हा भगवंताच्या दर्शनाचा योग होय.

**'नामसाधना'**—या पुस्तिकेंतून साभार, कृतज्ञतापूर्वक.

---

—सुख काय किंवा दुःख काय, त्यांचें जाणें येणें नेहमीं चालू असतें. त्यांपैकीं एकही शाश्वत टिकणारें नाहीं. या दोन्हीं अवस्थांच्या पलीकडे मला जावयाचें आहे, हा ध्यास साधकानें घेतला पाहिजे. त्यांच्या फेऱ्यांतून मी कसा पैलतिरास जाईन, याचा विचार त्यानें केला पाहिजे. त्याला दोन्हीं सारखीं वाटून त्यानें राग व द्वेष यांच्यापासून स्वतःची सुटका करून घेतली पाहिजे.

# साधकाची साधना

लेखक : **परशुराम**

भगवंताची प्राप्ति ही का सहजसाध्य गोष्ट आहे ? त्यासाठीं अपार कष्ट घ्यावे लागतात व एकनिष्ठेनें साधना करावी लागते. तेथें पाहिजे खंबीरपणा, एकनिष्ठा नि संपूर्ण श्रद्धा.

आम्हीं स्वतःला एक प्रकारचें वळण लाविलें पाहिजे. तें लावण्यासाठीं झटलें पाहिजे. आम्हीं स्वस्थ बसून चालणार नाहीं. सतत कांहीं ना कांहीं करीत राहिलें पाहिजे, आणि तें करीत असतां हें मी भगवंतासाठीं करीत आहें, हें कार्य त्याचें आहे, या भावनेनें आम्हीं वागलें पाहिजे. मग काय होईल ? आमच्याकडून हातांतील कार्य उत्तमप्रकारें पार पडेल. कारण तें भगवंतासाठीं केलेलें ! माझी कृति पाहून देव माझ्यावर प्रसन्न झाला पाहिजे; ही भावना अंतःकरणांत सतत वास करीत असावी. मला तो प्रसन्न झाला पाहिजे ही चिंता मनांत वास करीत असली म्हणजे हातांतील काम चांगलेंच होईल; आणि जें काम चांगलें होईल त्याची वाखाणणी झाल्याशिवाय कशी राहील ?

प्रत्येक माणसांत सुखोपभोगाची भयंकर लालसा असते. ती तृप्त व्हावी यासाठी त्याची धडपड अहर्निश चाललेली असते. ती लालसा पूर्ण झाली म्हणजे माणसाला मोठें सुख वाटतें ! हें वाटणें हा फार मोठा दोष आहे. ती लालसा बाळगणें हेंच मुळीं फार वाईट आहे. कां बरं ? कारण त्यामुळें भय, चिंता, लोभ, मोह, क्रोध, वृथाभिमान यासारखे मानवशत्रू हटकून डोके वर करूं लागतात. तेव्हा अनित्य, अशाश्वत अशा सुखोपभोगांकडे जाणून बुजून आपण कां बरें वळावें ? त्यांच्यापासून दूर रहाण्यांत व भगवत् चिंतन करण्यांत आपलें शाश्वत कल्याण आहे ही भावना आपल्याठायीं दृढ झाली पाहिजे. प्रत्येक मनुष्यावर कर्तव्यपालनाचे बंधन हें असतेंच असतें. त्यांत चुकारपणा करणें महापाप आहे. कर्तव्यपालन मग तें स्वतः पुरते असो वा इतर कोणाही-साठीं असो. तें उत्तम प्रकारें नि समाधानकारक रीतीनें पार पाडण्यासाठीं आपण

मनापासून झटलें पाहिजे. कोणाच्या वाट्यास कोणतें कर्तव्य येईल हें सांगतां येणें कठीण आहे, परंतु मानव-जन्म हा कर्तव्यपालनासाठीं आहे. आणि तें इमानें इतबारें पालन करण्यांत जीवनाचें सार्थक आहे.

ममत्व मग तें कोणत्याही बाबतींत असो. तें फार वाईट नि धोकादायक आहे. वस्तूवरील ममता, नातलगावरील ममता व इतर कोणत्याही बाबतींतील ममता ही अंतीं दुःखदायक नि तापदायक आहे. मग आपण आरंभापासूनच ममत्वाचा त्याग करणें हिताचें नाहीं का ? वस्तूवर, माणसांवर आपण जरूर प्रेम करावें परंतु तें जेवढ्यास तेवढें असावें. वस्तूंचा, माणसांचा आपण नीट सांभाळ करावा व आपल्या दैनंदिन कार्यांत त्यांचा जरूर तो उपयोगही अवश्य करून घ्यावा; परंतु त्यांचा लोभ बाळगूं नये. तो लोभ अंतीं दुःखास कारण होत असतो. कारण वस्तुजात असो वा मानवजात असो; त्यांना शाश्वतता नाहीं. तीं दृष्टीआड होऊन आपणास दुःखांत लोटून अदृश्य कधीं होतील हे कोणीही सांगूं शकणार नाहीं. मग कशाला बाळगा त्यांचा लोभ आणि कशाला करा त्यांच्यावर घनदाट माया—ममता !

* * *

आपण विवेकी, विचारी बनलें पाहिजे. विचारशून्य जीवन वांछनीय नाहीं. विचारी जीवन आदरणीय असतें. स्वतःच्या विवेकावर आपली श्रद्धा असली पाहिजे. तरच ग्रंथवाचनापासून व गुरूजनांकडून जो कांहीं विचारांचा लाभ होईल त्यांचा आदर करावा असें आपणास वाटेल. सुविचार, मग तो कुठून वा कोणत्याही मार्गानें मिळालेला असो. त्याचा आपण सादर स्वीकार करण्याचें धोरण स्वीकारलें पाहिजे. ‘थेंबें थेंबें तळें साचे’ या न्यायानें मग आपलें अंतःकरण सद्विचारांनीं भरून जाईल व आपलें जीवन त्यामुळें सार्थकीं लागेल.

साधकानें उपदेशक, पुढारी किंवा प्रचारक बनण्याची आकांक्षा कधींही बाळगूं नये. त्यामुळें अहंता न समजतां आपल्या अंगाशीं येऊन चिकटण्याचा दाट संभव असतो. आपणास स्वतःमधील दोष जितके लौकर दूर करतां येतील तेवढे करण्यासाठीं झटावयाचें आहे. दुसऱ्यांचें मार्गदर्शन जरूर तेथें करावें परंतु तें स्वतः स्वीकारलेल्या मार्गास पोषक होऊन रहाणारें असावें. आम्ही एक-मेकांस सहाय्यकारी व्हायचें आहे परंतु तें कसें ? अहंता स्वतःला चिकटूं न देतां !

# भगवंताची पूजाअर्चा

*********************

## कांहीं मननीय सुविचार

तुम्हांला भगवंताची भक्तिभावानें पूजाअर्चा, करायची आहे ना? मग त्यांना आवडणारीं फलपुष्पें कोणतीं? श्रद्धा, भक्ति, सत्यप्रेम, दयामाया, मित्रभाव, बंधुभाव, सरळपणा, सज्जनपणा, समता, सत्य, क्षमा या पुष्पांनीं त्याची पूजा करायची असते. भगवंत तुम्हांला जवळ यावा असें वाटतें ना? मग हीं पुष्पें त्याला अर्पण करा. म्हणजे काय करा? त्या सुगंधी सद्गुणांचें आचरण करण्यासाठीं सदैव झटा. भगवंताची बैठक तुमच्या अंतःकरणांतच आहे. तो तुम्हांला केव्हां दिसेल माहीत आहे? ज्यावेळीं त्याला साक्ष ठेऊन, वरील सद्गुण आचरणांत आणण्याचें तुम्हीं आपलें कर्तव्य ओळखाल त्याचवेळीं !

वर ज्या सुगंधी नि सुंदर पुष्पांचा उल्लेख केला तीं फेकून देऊन किंवा तीं पायदळीं तुडवून जो कोणी बाहेर बाजारांत किवा बागेंत मिळणारीं फुलें आणून त्याची पूजा करूं लागेल त्याला भगवान् कधींही दृष्टीस पडणार नाहीं. तो त्याच्या वाऱ्यालाहीं उभा रहाणार नाहीं. मग काय आहे त्या पूजेचें प्रयोजन?

* * *

हें जग क्षणभंगुर आहे. जगाचा निरोप घेऊन कोणाला कधीं जावें लागेल हे कोणीही सांगूं शकणार नाहीं. मृत्यू आपला जबडा उघडून तयार राहिला आहे. तो आपल्या जबड्यांत तुम्हांला पकडून कधीं गट्ट करून टाकील हें सांगतां येणार नाहीं. मनुष्य कितीही थोर योग्यतेचा असो; त्याच्यावर मृत्यू कोणत्या क्षणीं झडप घालीत हें सांगतां येणार नाहीं. यासाठीं काय करणें आपल्या हातीं आहे? आपण सतत सावधान रहावयाचें. आपल्यामुळें कोणालाही कशाही प्रकारें दुःख पोहोंचूं नये यासाठी सदैव डोळ्यांत तेल घालून जपायचें. ही जपणूक आपल्या हातची गोष्ट आहे नाहीं का? आपण सर्वांच्या सुखासमाधानासाठीं झटायचें आपल्यामुळें कोणाला अपाय किंवा दुःख होऊं नये यासाठीं झटायचें, सर्वांच्या मंगलासाठीं, कल्याणासाठीं व उत्कर्षासाठीं झटून प्रत्येकाकडून 'भला

रे भला ' म्हणवून घ्यावयाचें. जगणें म्हणतात तें याला. जो अशारीतीनें जगला तो अक्षय जगला. असें जीवन जगण्यासाठीं आपण झटूंया नि या जगांत अशा रीतीनें वावरूं या. आपलें लक्ष भगवंताच्या चरणाकडे लागून राहिलेले असूं द्या. ते चरण तुम्हांला दूर किंवा दुःखांत कधीही लोटणार नाहींत. आपलें लक्ष त्याच्या चरणाकडे लागून राहिलें म्हणजे तुमच्याकडून पापाचरण सहसा घडणार नाहीं.

\+ + + +

तुम्हीं कोणत्याही परिस्थितींत कधींही निराश होऊं नका. ' धीर सो गंभीर ! ' निराश होऊन तुम्हीं काय मिळविणार आहांत बरं ? माझ्याकडून काय होणार ? मी काय करूं शकणार ? असे विचार तुमच्या मनांत कधींही येऊं देऊं नका. तुम्हीं सामर्थ्यसंपन्न आहांत. जीं थोर नि समर्थ माणसें होऊन गेली व आजही जगांत वावरत आहेत, त्यांच्या प्रमाणेंच तुम्हीं आहांत. त्याची जाणीव मात्र तुम्हांला झाली पाहिजे. मी काय वाटेल तें करूं शकेन, ही हिंमत सदैव अंतःकरणांत बाळगा. ' तुझें आहे तुजपाशीं परि तूं जागा चुकलासी ' असें झालें आहे तुमचें ! इतरांप्रमाणें तुमच्या ठायींही प्रचंड शक्ति आहे. ती झांकली गेली आहे. तिच्यावर केरकचरा सांचला आहे. एकदां मारा जोरानें फुंकर ! म्हणजे पहा, त्या शक्तीची तुम्हाला जाणीव होईल.

माणसानें कोणत्याही गोष्टीचा निर्धार केला पाहिजे. हिंमत बाळगली पाहिजे. आळस सोडून योग्य मार्गानें उद्योगाला लागलें पाहिजे. आत्मविश्वास हा दांडगा गुण आहे. त्याची कास बळकट धरा आणि मग पहा, काय चमत्कार घडून येतो तो !

\+ + + +

तुम्हांला कांही ना कांहीं साध्य करायचें आहे ना ? झाला तुमचा निर्धार ? मग लागा उद्योगाला—अगदीं चिकाटीनें नि सातत्यानें बरं का ! मग तुमचें ध्येय कितीही उच्चतम असेना का; तें प्राप्त करून घेण्यांत तुम्हांला यश मिळालेंच पाहिजे.

' मी काय करणार ! माझ्याकडून काय होणार ? ' पाय मोडून घालणारे असले विचार कहींही मनांत आणूं नका. तुम्ही चिकाटीनें नि सातत्यानें उद्योग करूं लागलां म्हणजे भगवंतच तुमच्या सहाय्याला धावून येईल. तो अत्यंत दयाळू आहे. तो उगाच्या उगाच तुम्हांला लोंबकळत किंवा तळमळत कहींही ठेवणार नाहीं. निर्धार निश्चय आणि संपूर्ण विश्वास यांची कांस मात्र तुम्हीं कोणत्याही परिस्थितींत सोडतां कामा नये. मग पहा तुमची मनकामना पूर्ण होते कीं नाहीं तें !

# श्री साईबाबांची ५० वी पुण्यतिथी

## सुवर्णमहोत्सवाचा जंगी कार्यक्रम

श्री साईबाबांच्या शिरडी संस्थानच्या दृष्टीनें चालू वर्ष फार महत्वाचें आहे, कारण येत्या विजयादशमीस साईबाबा समाधिस्थ होऊन पन्नास वर्षें होत आहेत. त्यानिमित्त बाबांच्या सुवर्णमहोत्सवी पुण्यतिथीचे शिरडी व मुंबई येथें जंगी कार्यक्रम आखण्यात येत आहेत.

शिर्डी येथील सुवर्णमहोत्सव श्री साईबाबांच्या मंदिरांत साजरा केला जाणार आहे. तर मुंबईतील महोत्सव सेंट झेविअर कॉलेज जिमखान्याच्या भव्य पटांगणावर होणार आहे.

प्रथमतः हा महोत्सव शिरडी येथें व्हावा असा विचार होता; परंतु या महोत्सवाच्या बाबतींत व बाबांच्या बाबतींत भक्तजनांचा उत्साह फार दांडगा नि अपरंपार आहे. शिरडीप्रमाणें मुंबई व आसपासच्या भागांतील जनतेसाठी मुंबईतही उत्सव व्हावा असें अनेक भक्तांनी सुचविल्यावरून त्याप्रमाणें जय्यत ती तयारी सध्यां चालू आहे, तदनुसार उपरोक्त कॉलेजच्या पटांगणावर प्रत्यक्ष शिरडी येथील बाबांच्या मंदिरासारखी तात्पुरती वास्तु निर्माण करून तेथील वातावरणाचाही लाभ तेथें भक्तांना मिळणार आहे.

वाचकांनीं दोन्हीं ठिकाणच्या उत्सवाच्या पुढील तारखा कृपा करून लक्षांत ठेवाव्या. शिरडी येथील उत्सव ता. २३ सप्टेंबर रोजीं सुरू होऊन ता. १ आक्टोबर रोजीं त्याची समाप्ति होईल. तर मुंबईतील महोत्सव ११ आक्टोबरला सुरू होऊन चार दिवसांनीं म्हणजे ता. १४ आक्टोबर १९६८ रोजीं त्याची समाप्ति होईल.

शिरडी येथील उत्सवांत भाग घेण्यासाठी भारतांतील नामांकित विद्वान वक्ते, पंडित, प्रवचनकार, व्याख्याते, गायक, गायिका व भक्त यांस खास

आमंत्रणें पाठवून निमंत्रित करण्यांत येत आहे. तेथें मंदिरांत रोज चालणारी पूजाअर्चा, वेदघोष, अभिषेक, आरती वगैरे कार्यक्रमांशिवाय तेथें ठरलेल्या तारखांस रोज कथा-कीर्तनें, व्याख्यानें, प्रवचनें व गायनवादनाचे कार्यक्रम होणार आहेत. गायनवादन नृत्यादि ललित-कलानिपुण मंडळींत बाबांचे असंख्य भक्त आहेत. त्या सर्वांना वरील प्रसंगीं हजेरी देण्याची संधी मिळणार आहे. विद्वान व्याख्यात्यांचीं व्याख्यानेंही होणार आहेत. हजारों भक्तजनांना या कार्यक्रमांचा लाभ घेतां यावा यासाठीं मोठमोठे मंडप घालून जागोजागीं सर्वत्र दूरध्वनिक्षेप लावून ठेवण्यांत येणार आहेत.

या महोत्सवाच्या काळांत बाबांचे हजारो भक्त शिरडींत येतील त्या सर्वांची रहाण्यासवरण्याची व जेवणाखाण्याची सुव्यवस्था अल्प मोबदल्यांत करण्यांत येईल. आंघोळीला ज्यांना जरूर त्यांना गरम पाणी मिळेल व साधें शाकाहारी भोजन मिळेल. यात्रेकरूंच्या येण्याजाण्याची चांगली सोय व्हावी यासाठीं खास जादा बस गाड्या सोडण्याची व्यवस्था राज्यसरकारच्या त्या खात्याकडून करण्यांत येणार आहे. वेळेवर जाण्यायेण्याची व्यवस्था व्हावी यासाठीं अगाऊ जागा रिझर्व्ह करणें हे सुखसोयीचें आहे.

वर नमूद केल्याप्रमाणें मुंबईतील उत्सव ता. ११ ते १४ आक्टोबर मिळून चार दिवस चालणार आहे. या उत्सवासाठीं शिरडी येथील मंदिरांतून बाबांच्या पादुका नाशीकपर्यंत पालखींतून आणण्यांत येतील. ही पालखी ता. १० आक्टोबर रोजीं नाशीक क्षेत्रीं थांबेल व ता. ११ रोजीं सकाळींच तेथून पादुका मोटारीनें मुंबईत आणण्यांत येतील.

मुंबईचें प्रवेशद्वार म्हणजे सायन (शिव) तेथें मुंबई उत्सव समितीचे सभासद समारंभपूर्वक पादुकांचें स्वागत करतील. नंतर दादर येथील साईनिकेतन (खोदाद सर्कल) जवळून गायन वादन—भजनासह पालखी मिरवणुकीनें सेंटझेविअर कॉलेज जिमखान्याच्या पटांगणांत आणण्यांत येईल व तेथील मंदिरांत विधिपूर्वक त्यांची स्थापना करण्यांत येईल. तेथें शिरडीप्रमाणेंच रोज पूजा-अर्चा, भजन आरति वगैरे सर्व कार्यक्रम यथासांग सुरू होतील. या पादुका ता. १५ रोजीं सकाळीं परत शिरडीस नेण्यांत येतील.

मुंबई येथील उत्सवांत शिरडीप्रमाणें सर्व कार्यक्रम होतीलच आणि शिवाय भारतांतील नामांकित गायक, वादक मंडळींचे कार्यक्रम ठेवण्यांत येत आहेत. सुप्रसिद्ध संगीत दिग्दर्शक पद्मश्री वसंत देसाई यांनीं या संघटनेची जबाबदारी मोठ्या हौसेनें स्वीकारली आहे.

या कार्यक्रमाच्या शेवटच्या दिवशीं एक प्रचंड जाहीर सभा भरविण्यांत येईल. त्यावेळीं श्रीसाईबाबा स्मृति ग्रंथाचें प्रकाशन होईल व श्रीसाईबाबा फाऊंडेशनचा शुभारंभ जाहीर करण्यात येईल.

या महोत्सवांतील आणखी १–२ वैशिष्ट्यें म्हणजे निरनिराळ्या भाषांतील धार्मिक ग्रंथांचे प्रदर्शन व संतांच्या फोटोंचें प्रदर्शन होय. मुम्बई मराठी ग्रंथ संग्रहालयाचे उत्साही कार्यकर्ते या कार्याकडे लक्ष पुरवीत आहेत.

या महोत्सवानिमित्त श्री साईबाबांच्या जीवनकार्याचा परिचय करून देणारें विविध प्रकाशनही प्रकाशित होणार आहे.

---

—ईश्वरप्राप्तीसाठीं कर्मकांडाची जरूरी नाहीं. मात्र त्याच्या भेटीची तीव्र लालसा तुमच्याठायीं निर्माण झाली पाहिजे. त्याच्या भेटीची उत्कंठा व व्याकुळता वाढत गेली पाहिजे. या दोन गोष्टी ज्या वेगांत तुमच्यापाशीं असतील, त्याच वेगांत किंवा उशीरां व शीघ्र गतीनें तो तुमच्या सन्निध येईल व तुम्हांला दर्शन देईल.

# संतश्रेष्ठाचें वेद-भाष्य

लेखक : द. मो. चित्रे

संतश्रेष्ठ श्री तुकाराम महाराज यांचें वेदांचें अध्ययन किती सूक्ष्म होतें हेंच आपण आज पहाणार आहोंत. श्रीमत् आद्य. शंकराचार्य यांनीं वेदावर शांकरभाष्य लिहून तद्विषयक आपले विचार लोकांच्या समोर मांडले. श्री तुकाराम महाराज यांनीं वेदासंबंधी आपले विचार अनेक अभंगांच्या द्वारें स्पष्ट केले आहेत. खालील अभंगांत श्री तुकाराम महाराज अगदीं स्पष्टपणे म्हणतात की वेदांचा अर्थ आम्हांलाच कळला आहे.

"वेदांचा अर्थ तो आम्हांसीच ठावा। येरांनीं वाहावा भार माथां ॥ १ ॥
॥ धृ० ॥ खादल्याची गोडी देखिल्यासी नाहीं। भार धन वाही मजूरीचें ॥
उत्पत्ति पाळण संहाराचें निज । जेणें नेले बीज त्यांच्या हातीं ॥ २ ॥
तुका म्हणे आलें आपणचि फळ। हातोहातीं मूळ सांपडलें ॥ ३ ॥"

वेदांचें गुह्य आम्हांलाच समजलें आहे. इतरांनीं फक्त वेदांचा बडिवार माजवावा व अर्थशून्य बडबड करावी आणि ओझे वाहणाराची भूमिका पार पाडावी. आम्हांला वेदांचा खरा अर्थ कळला आहे. उत्पत्ति, स्थिती आणि लय यांचें बीज ज्याला गवसलें आहे त्याच्या हातीं सर्व फळ आलें आहे.

विठोबाचें नामस्मरण हाच वेदांचा आदेश. सामान्य जनाला सुलभ असा हा मार्ग आहे. "वेदाचे गव्हर न कळे पाठकां। अधिकार लोकां नाहीं येरां ॥ १ ॥ धृ० ॥ विठोबाचें नाम सुलभ सोपारें। तारी एक सरे भवसिंधु ॥ जाणत्या असाध्य मंत्र तंत्र काळ। येर तो सकळ मूढ लोक ॥ २ ॥ तुका म्हणे विधि निषेध लोपला। उच्छेद या जाला मारगाचा ॥ ३ ॥ पुढील अभंगांत त्यांनीं हाच अर्थ अधिक स्पष्ट केला आहे. "वेद अनंत बोलिला। अर्थ इतकाचि साधिला ॥ १ ॥ ॥ धृ० ॥ विठोबासी शरण जावें। निज निष्ठा नाम गावें। सकळ शास्त्रांचा विचार। अंतीं इतका चि निर्धार ॥ २ ॥ अठरा पुराणीं सिद्धांत।

तुका म्हणे हानि हेत ॥ ३ ॥ "वेद जया गाती । आम्हां तयाची संगति ॥ १ ॥ । धृ० । नाम धरियेलें कंठीं । अवघा सांठविला पोटीं ओंकाराचें बीज । हानी अमुचे तें निज ॥ २ ॥ तुका म्हणे बहु मोटें । अणुरेणिया थाकुटें ॥ ३ ॥

शास्त्रज्ञांना अणुचें आकलन रसायन शाळेंत झालें असेल. संतांनां अणुचें आकलन हृदयांत झालेलें असतें ! श्री तुकाराम महाराज म्हणतात, विश्वाचें बीज अणुरेणूहूनहि लहान आहे. तसेंच ब्रह्मांड व्यापण्याइतकें मोठेंहि आहे. मोठ्यांत मोठें लहानांत लहान असें हें विश्वबीज आहे !

हे परमात्मन्, तुझा हा काय खेळ चालला आहे ? "वेद पुरुष तरि नेती कां वचन । निवडुनि भिन्न दाखविलें ॥ १ ॥ ॥ धृ० ॥ तुझी वर्मे तूचि दावूनि अनंता । होतोसी नेणत्या कोणत्या गुणें यज्ञाचा भोक्ता तरि कां नव्हे सांग । उणे पडतां अंग क्षोभ पडे ॥ २ ॥ वससी तूं या भूतांचे अंतरीं । तरी का हरी भेद दावियेला ॥ ३ ॥ तपतीर्थाटणें तुझें मूर्ति ज्ञान । तरि कां अभिमान आड येतो ॥ ४ ॥ आतां क्षमा कीजे विनवितो तुका । देऊनियां हाका उभा द्वारीं ॥ ५ ॥

'नेती', 'नेती' 'हें नव्हे' 'हें नव्हें' ह्या निष्कर्षापर्यंत वेद आले. खूप मनन, चिंतन, ध्यान केलें. तरीही तूं हातीं गवसला नाहींस. हे परमात्मन्, तूं सर्व भूतांच्या ठायीं वसला आहेस; मग असा भेदाभेद कां ? सबंध देश-भर तीर्थयात्रा केल्या. पण मनाचें समाधान झालें नाहीं. परमात्मन्, आतां विनंती हीच कीं हाक मारताच विटेवर उभे रहा. तुमचे चरण मला घट्ट धरूं द्या . त्याच्या शिवाय मला समाधान होणार नाहीं.

"वेदविहित तुम्ही आइका हो कर्में । बोलतों तीं वर्में संतांपुढें ॥ १ ॥ ॥ धृ० ॥ चारी वर्ण जाले एकाचिये अंगीं । पापपुण्य भागीं विभागले ॥ प्रथम पाउली पावविला पंथ । आदि मध्य अंत भेद नाहीं ॥ २ ॥ आंबे बोरी वड बाभुळा चंदन । गुणागुणें भिन्न अग्नी एक ॥ ३ ॥ तुका म्हणे मन उन्मन जो होय । तोंवरी हे सोय विधि पाळी ॥

या अभंगांत श्री तुकाराम महाराजांनीं योगशास्त्रांतील एक महान सूत्र सांगितलें आहे. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र हे चार वर्ण गुण आणि कर्म या प्रमाणें विभागले आहेत. जसे आंबा, बोरी, वड, बाभुळ,

चंदन हे सर्व वृक्षच आहेत. उपयुक्ततेप्रमाणें त्यांचें वर्गीकरण केलें जातें. त्याचप्रमाणें हे वर्णभेद आहेत. समाजजीवन नीटपणें चालण्यासाठीं भिन्न भिन्न गुणांचीं माणसें असावीं लागतात. युरोप खंडांत समाजवाद अवतीर्ण होण्यापूर्वी दोन शतकें आधीं भारतीय संतांनीं समाजवादाचीं सूत्रें जनमानसांत रुजविलीं होती. श्रीमंत गरीब, काळे गोरे यांच्यांतील संघर्ष आज पराकोटीला गेलेला आहे. आणि अस्त्राचा जर सर्रास उपयोग केला तर जगाचाच अंत होण्यापर्यंत पाळी आली आहे. या जागतिक अरिष्टांतून सुटका करून घेण्यासाठी संतांचाच आसरा शोधावा लागेल. श्रीसंतश्रेष्ठ तुकाराम महाराजांनीं म्हटल्याप्रमाणें मानवी मनाची उन्मनापर्यंत उत्क्रांती व्हावयास पाहिजे. योगसाधनेनें मन उन्मनापर्यंत नेतां येतें. त्याचाच उल्लेख श्री तुकाराम महाराजांनीं या अभंगांत केला आहे.

"अरे हें काय अरिष्ट ओढविलें ? वेद नेले शंखासुरें । केलें ब्रह्मानें गान्हाणें ॥ १ ॥ ॥ धृ० ॥ धांव धांव झडकरी । ऐसा कृपाळुवा हरी ॥ २ ॥ गजेन्द्र नाडियें गांजिला । तेणें तुझा धांवा केला ॥ २ ॥ तुका म्हणे पद्मनाभा । जेथें पाहें तेथें उभा ॥ ३ ॥"

शंखासुरच तो त्याला ज्ञानाचें महत्त्व काय कळणार ? त्यानें वेदाचा अपहार केला आहे. बा पांडुरंगा गजेंद्रमोक्षाच्या वेळीं तूं धांवून आलास आणि सुसरीपासून हत्तीचें रक्षण केलेस मग आज मागें कां ? आज वेदच शंखासुरानें पळविले आहेत. ब्रह्मदेवच गान्हाणें करतो आहे. तेव्हां पांडुरंगा, धांव धांव आणि शंखासुराच्या हातून तो ज्ञानाचा सांठा सोडव. मानवसमाजावर उपकार होतील. आणि भाग्य हें कीं ते वेद आजही सुरक्षित आहेत !

वेदाबद्दल श्री तुकाराम महाराजांना केवढा आदर होता तो पुढील अभंगावरून व्यक्त होतो. "वेदशास्त्र नाहीं पुराण प्रमाण । तयाचे वदन नांव लोका ॥ १ ॥ ॥ धृ० ॥ तार्किकाचे अंग आपणा पारिखे । माजिऱ्या सारखें वाईचाळे ॥ + माता निंदी तया कोण आधार । भंगलें खापर याचे नावें ॥ २ ॥ तुका म्हणे आडराणें त्याची चाली । तयाची ते बोली मिठें विण ॥ ३ ॥

श्री तुकाराम महाराज म्हणतात. ज्याला वेदशास्त्र किंवा पुराण यांपैकी कांहीही प्रमाण नाहीं त्याला काय म्हणावें? अशा तार्किकीचे अंग आम्हांला पारिखे आहे. वेद, शास्त्र आणि पुराण न मानणें म्हणजे माजोरीपणा आहे. जो मातेची निंदा करतो त्याला कोण आधार देणार? त्याच्या नांवाचें मडके फुटलेलें आहे. ज्याला आडरानांतूनच चालत जाण्याची संवय आहे. त्याचें बोलणें मिठाच्या अभावीं अळणी बनतें. जगाच्या ज्ञानभांडारांतून वेदांना वगळा कीं सर्व ज्ञान बेचव होईल! वेदांतील ज्ञान कण ज्ञान भांडारांत मिसळा त्याच ज्ञानाला अवीट अशी गोडी येईल. वेदांचे महत्व आहे तें हें.

सुरवातीला म्हटल्याप्रमाणें वेदांचें महत्व श्री तुकाराम महाराजांना पूर्णपणें कळलें आहे. स्वतःच श्री तुकाराम महाराजच तसे म्हणतात. जागतिक ग्रंथभांडा-रांतील आद्य ग्रंथ म्हणजे वेद. " ओम् सहनाववतु। सहनौ भुनक्त। सहवीर्यम् करवावहै। तेजस्वीनावधीममस्तु। मा विद्विषावहै। हाच वेदांचा आदेश आहे.

---

—आपल्या वाट्यास कधीं कधीं प्रतिकूळ परिस्थिति येते. त्यावेळीं जन्म-दात्याच्या नावानें खडे फोडण्यांत अर्थ नाहीं. वाट्यास आलेल्या स्थितींत समाधान मानून त्याचें चिंतन निष्ठापूर्वक करीत रहाणें. हाच आपत्तींतून पार पडण्याचा राजमार्ग आहे.

# सर्वस्वाचा त्याग म्हणजे काय ?

—गीताचा प्रसाद— श्री विनोबा भावे

तुकोबारायांचे अभंग म्हणजे भगवंतानीं सांगितलेली प्रती गीताच. त्यांत मनन करून आचरणांत आणण्यासारखें किती तरी असतें. संत विनोबा भावे यांनीं केलेलें तुकोबांच्या दोन अभंगांचें विवरण:—

सर्वस्वाचा त्याग तो सदा सोवळा ।
न लिंपे विटाळा अग्नि जैसा ॥ १ ॥
सत्यवादी करी संसार सकळ ।
अलिप्त कमळ जळीं जैसे ॥ २ ॥
घडे ज्या उपकार भूतांची ते दया ।
आत्मस्थिति तया अंगीं वसे ॥ ३ ॥
न बोले गुण दोष नाइके जो कानीं ।
वर्तोनि तो जनीं जनार्दन ॥ ४ ॥
तुका म्हणे वर्म जाणितल्याविण ।
पावो करितां शीण सांडी-मांडी ॥ ५ ॥

ज्यानें सर्वस्वाचा त्याग केला तो नेहमींचाच सोवळा आहे. जसा अग्नीला विटाळ माहीतच नाहीं तसाच त्यालाहि विटाळ माहीत नाहीं. जो सर्व व्यवहार सत्याला अनुसरून करतो आणि त्यांतहि पुन्हां कमलाप्रमाणें अलिप्त राहतो त्यानेंच सर्वस्वाचा त्याग केला. भूतदयेमुळें ज्याचें जीवन सेवामय बनलें आहे त्याच्याच अंगीं आत्मज्ञान बाणलें. जो गुणदोषांच्या चर्चेपासून वेगळा राहिला तो जनांमध्ये वागत असला तरी ईश्वररूपच आहे. तुकाराम महाराज म्हणतात कीं खऱ्या त्यागाचे हें वर्म लक्षांत न घेतां जो 'हे सोड' आणि 'तें जोड' असल्या नादीं लागला तो शीण मात्र पावणार आहे.

[ १ ] त्याग म्हणजे टाकून देणें. पण सर्वस्वाचा त्याग म्हटला म्हणजे तेथें टाकून देण्याच्या 'क्रियेला' अवकाश राहत नाहीं. पाण्याचा धर्म वाहणें पण जग पाण्यानें भरलें असें समजा. आतां तें पाणी कोठें आणि कसें वाहणार ? घराबाहेर जावयाचें तर 'जाण्याची क्रिया' होऊं शकेल. पण जगाबाहेर जावयाचें तर बसल्या जागीं कायम राहून मन अलग करणें ह्याशिवाय इलाज

नाहीं. म्हणून ' सर्व-त्याग ' ह्याचा अर्थ ' सर्वांत राहून [ मनानें ] त्याग ' किंवा अहंकाराचा त्याग असाच समजला पाहिजे.

तेवीं बुद्धिमंतीं देहीं । अहंता सांडूनि पाहीं ।
सांडिजे अशेषहि । संसार-जात ॥ –ज्ञानदेव

( २ ) सत्याला धरून चालावें. आणि त्यांतहि अलिप्त राहावें. सत्यानें पाप मरतें. आणि अलिप्ततेनें पुण्य मरतें, म्हणजे चिकटत नाहीं ' प्रवृत्ति ' रजोगुणाचें लक्षण म्हटलें आहे. आणि ' अप्रवृत्ति ' तमोगुणाचें लक्षण म्हटलें आहे. मग करावें कसें ? एकीकडे रजोगुणाचा आड आणि दुसरीकडे तमोगुणाची विहीर. गीतेनें ह्यांतून मार्ग काढला आहे. अप्रवृत्तीचा त्याग कर. प्रवृत्तींत अलिप्त रहा. ह्याला निवृत्ति म्हणावयाचें. ह्याला दृष्टांत कमलाचा. ' कमल ' ही वैदिक धर्माची खूण आहे. कमलांत पवित्रता व अलिप्तता दोन्ही गुण आहेत.

' यथा पुष्कर-पलाशे आपो न श्लिष्यन्ते । '— श्रुति
' लिप्यते नस पापेन पद्म-पत्रमिवाम्भसा । ' गीता
मग मी व्यवहारीं असोनि वर्तत ।
जेवीं जळाआंत पद्म-पत्र ॥ ' –तुकाराम

( ३ ) जे कां रंजले गांजले । त्यांसी म्हणे जो आपुले
तोचि साधु ओळखावा । देव तेथेंचि जाणावा
मृदु सबाह्य नवनीत । तैसें सज्जनाचें चित्त
ज्यासी आपंगिता नाहीं । त्यासी धरी जो हृदयीं
दया करणें जे पुत्रासी । तेचि दासा आणि दासी
तुका म्हणे सांगूं किती । तोचि भगवंताची मूर्ति ॥ तुकाराम

( ४ ) ' आणिकांचे कानीं । गुण-दोष मना नाणीं '
' कासया गुण-दोष वांणू आणिकांचे ।
मज काय त्यांचें उणें असे ॥ '—तुकाराम
' गुण-दोष-दृशिर्दोषो गुणस्तूभय-वर्जितः ' भागवत

अर्थ—

पराचा देखावा दोष-गुण । हाचि दोषामाजीं महादोष जाण ।
गुणदोष न देखावा आपण । हा उत्तम गुण सर्वार्थी ॥—एकनाथ

( ५ ) त्यागाचे वर्म न ओळखतां केलेला बाह्यत्याग ओझें होऊन बसतो.

**कर्मण्यकर्म यः पश्येदकर्मणि च कर्म यः ।**
**स बुद्धिमान् मनुष्येषु ॥**—गीता

अकर्मांत कर्म आणि कर्मांत अकर्म हें त्यागाचें वर्म जो ओळखतो, तोच 'बुद्धिमान'

खालील अभंग मननीय—

**जाणोनि नेणतें करीं माझें मन । तुझी प्रेमखूण देऊनियां ॥ १ ॥**
**मग मी व्यवहारीं असोनि वर्तेन । जेवी जळाआंत पद्म-पत्र ॥ २ ॥**
**ऐकोनि नाइकें निंदास्तुति कानीं । जैसा कां उन्मनीं योगिराज ॥ ३ ॥**
**देखोनि न देखें प्रपंच हा दृष्टी । स्वप्नीचिया सृष्टी चेइल्या जेवीं ॥ ४ ॥**
**तुका म्हणे ऐसें जालियावांचून । करणें तो शीण वाटतसे ॥ ५ ॥**

'करणें तो शीण' म्हणजे 'बरवरचा त्याग करणें तो शीण' असा अर्थ समजावा.

## वैष्णवांचा धंदा

**मायबाप करिती चिंता । पोर नाइके सांगतां ॥ १ ॥**
**नको जाऊं देउळासी । नेतो बागुल लोकांसी ॥ २ ॥**
**वैष्णवां संगती । हातीं पडलीं नेणों किती ॥ ३ ॥**
**कर्णद्वारें पुराणिक । भुलवी शब्दें लावी भीक ॥ ४ ॥**
**आम्हां कैंचा मग । करिसी उघडियांचा संग ॥ ५ ॥**
**तुका म्हणे जाणें नरका । त्यांचा उपदेश आइका ॥ ६ ॥**

पोर सांगितलेलें ऐकत नाहीं. त्यामुळें आईबापांना चिंता पडली आहे. "अरे, देवळांत जात जाऊं नकोस. जो म्हणून देवळांत गेला, त्याला ह्या बागुलांनीं लांबविला. एकदां माणूस वैष्णवांच्या संगतीला लागला म्हणजे हळहळू तो त्यांच्या कचाट्यांत सांपडतो. असें आजपर्यंत ह्यांनीं कितीक पकडले कोणास ठाऊक ! हे पुराणिक कानांत भलभलते भरून भुरळ पाडतात, आणि शेवटीं भिकेला लावतात. तूं जर असा ह्या नागड्याच्या नादीं लागलास तर मग आमच्या काय उपयोगाला येशील ?"

तुकाराम महाराज म्हणतात, जर तुम्हांला नरकांत जाणें असेल तर हा उपदेश ऐकत चला.

आपण 'बिघडून' दुसऱ्यांना 'बिघडविणें' हा संताचा स्वभावच आहे. त्यांतून 'तरुणांना' बिघडविणें हें तर त्यांचें अवतारकार्य. त्यामुळें आईबापांना चिंता वाटणें साहाजिक आहे. तुकाराम महाराजांच्या उपदेशानें त्या कालच्या तरुण पिढीवर बैराग्याची छाप पडूं लागली होती. त्यांतून आपल्या सोनुल्यांना बचवण्यासाठीं आईबाप कशी काळजी घेत त्याचें वर्णन ह्या अभंगांत आहे.

आईबापांचे वैष्णवांवर मुख्य दोन आक्षेप होते :–

(१) ह्यांच्या नादीं लागून मुलांचा संसार धुळीस मिळतो. तीं भिकेला लागतात.

हा आक्षेप तुकाराम महाराजांना अक्षरशः कबूल आहे. संसाराचें वाटोळें होणें ही त्यांनीं ईश्वरी-कृपेची खूणच मानली आहे—

**देवाची ते खूण आला ज्याच्या घरा**
**त्याच्या पडे चिरा संसारासी ॥ १ ॥**
**देवाची ते खूण करावें वाटोळें ।**
**आपणावेगळें राहों नेदी॥ २ ॥**

प्रपंच किंवा परमार्थ कांहीं तरी एक साधेल. दोन्ही गोष्टी साधणार नाहींत, ही गोष्ट तुकाराम महाराजांनीं निक्षून सांगितली आहे—

**प्रपंच परमार्थ संपादीन दोन्ही ।**
**एकहि निदानीं नव्हे त्यासी ॥ १ ॥**
**दोन्ही पेंवांवरी ठेवूं जातां हात ।**
**होय अपघात शरीराचा ॥ २ ॥**
**तुका म्हणे तया दोहींकडे धक्का ।**
**शेवटीं तो नरकामार्जीं पडे ॥ ३ ॥**

अशा स्थितींत आईबापांना बोल कां लावावा ?

(२) वैष्णवांवरचा दुसरा आक्षेप म्हणजे ह्यांच्या नादीं मुलें लागलीं म्हणजे तीं 'आईबापांचीं मुलें' राहत नाहींत.

हाहि आक्षेप तुकोबांना नाकबूल नाहीं. कारण ममतेचा पाश तुटणें हेंच त्यांच्या मतें भक्तीचें लक्षण आहे—

भक्त ऐसे जाणा जे देहीं उदास ।
गेले आशापाश निवारूनि ॥ १ ॥
विषय तो त्यांचा झाला नारायण ।
नावडे जन धन माता पिता ॥ २ ॥

तसेंच—

देवाची ते खूण गुंतों नेदी आशा ।
ममतेच्या पाशा शिवों नेदी ॥

ईश्वर-प्राप्तींत अंतरायभूत होत असतील त्यांचा त्याग करावा असें कबीर आणि तुलसीदासजी म्हणतात. त्याला तुकाराम महाराजांचीहि संमति आहे.

' प्रह्लादने पिता तज्यो भरतने अपनी माय ।
विभीसनने भाई तज्यो श्रीरामके काज ॥ '—कबीर
'जाके प्रिय न राम वैदेही ।
त्यजिये ताहि कोटि वैरीसम
जद्यपि परम सनेही ॥
त्यज्यो पिता प्रह्लाद, बिभीखन
बंधु, भरत महतारी ॥ '—तुलसीदास
'जेणें नारायणीं घडे अंतराय ।
हो कां बापमाय त्यजावीं तीं ॥
प्रह्लादें जनक बिभीषणें बंधु ।
राज्य माता निंद्य भरतें केली ॥ ' —तुकाराम

आईबापांनीं असे आक्षेप काढले म्हणून तुकाराम महाराज त्यांना दोष देत नाहींत. त्यांना बिचाऱ्यांना खरें हित समजत नाहीं म्हणून ते मुलांना धोपट मार्ग दाखवितात.

हित नाहीं ठावें जननी—जनका ।
दाविला लौकिकाचार तिहीं ॥

तें प्रेमानेंच सांगतात; पण ऐकणाऱ्यानें तें ऐकूं नये एवढेंच त्यांचें म्हणणें.

आईबापांचें भलतें म्हणणें ऐकूं नये; पण त्यांची सेवा ही केलीच पाहिजे असा महाराजांचा कटाक्ष आहे.

मायबापें केवळ काशी । तेणें नजावें तीर्थासी ॥
पुंडलिकें काय केलें । परब्रम्ह उभें ठेलें ॥

# दोन बोधपर कथा

—संत विनोबा

## सांबर

एक सांबर होतं. तें रानात रहायचं. जंगलांत चरायचं. ओढ्यावर पाणी प्यायचं. एकदां असंच तें ओढ्याकाठीं पाणी पीत होतं. सायंकाळची वेळ होती. ओढ्याचं पाणी आरशासारखं स्थिर होतं. त्या पाण्यांत त्याला त्याची पडछाया दिसली. आपली झोकदार शिंगं पाहून त्याला मोठा अभिमान वाटला. तें मनाशी म्हणालं,

"माझी शिंगं किती सुंदर आहेत!"

आणि एकदम त्याची नजर त्याच्या पायांकडे गेली. बारीक बारीक आणि काळेविद्रे पाय पाहून तें निराश झालं. त्याच्या मनांत विचार आला.

"देव किती कृपण आहे! ज्या हातानं त्यानं माझी सुंदर शिंगं घडवलीं त्याच हातानं त्यानं असे विद्रूप पाय बनविले. मला लाज वाटते या पायांची." इतक्यात कुठून तरी शिकारी—बंदुकीचा आवाज ऐकू आला. सांबरनं मागं वळून पाहिलं आणि धूम ठोकली. पळता शिकाऱ्याची गोळी त्याच्या अंगाला लागली. गोळी ओझरती लागल्यानं सांबर तसंच पुढं पळत राहिलं. शिकारी त्याच्या मागं धावत राहिला.

पुढं रस्त्यांत एक काटेरी झुडप होतं. आपल्या तंद्रींत धावत असतांना सांबराचीं दोन्ही शिंगं त्या झुडुपांत अडकलीं. सांबरानं धडपड करून पाहिली पण त्याच्या धडपडीमुळं ती शिंगं झुडुपात जास्तच अडकत गेलीं.

इतक्यांत शिकारी तिथें पोचला. त्यानं सांबराची अवस्था पाहिली आणि निवांतपणे त्याला गोळी घातली. ही गोळी चुकणारी नव्हती. अचूकपणें ती सांबराच्या वर्मी लागली आणि सांबर पाय झाडूं लागलं. यावेळी सांबराच्या मनांत विचार आला—

"ज्या पायांना मी कुरूप म्हणत होतों त्याच पायांनी अखेरपर्यंत माझ्यासाठी धडपड केली आणि ज्या शिंगांना मी सुंदर म्हटलं त्या शिंगांनी मात्र माझा कायमचा घात केला."

म्हणूनच विनोबा म्हणतात कीं मोहक वस्तु माणसांचा विनाश करतात. आळस आणि चैन या गोष्टी सांबराच्या शिंगाप्रमाणें आहेत. आणि शारीरिक

परिश्रम त्याच्या पायाप्रमाणें आहेत. श्रमानं माणूस तरेल. चैनीच्या नार्दी लागला तर त्याची माती होईल.

## गुलाबी रंग

एक चित्रकार होता. त्यानं एकदा एक सुंदर चित्र तयार केलं. तें चित्र घेऊन तो विनोबांकडे आला आणि म्हणाला,

" हें चित्र तयार करतांना पन्नास रुपये खर्च झाले. कल्पना आणि श्रम हे वेगळे आहेत. यामधला सायंकालीन गुलाबी रंग आपणास कसा वाटतो ? "

चित्रकाराचा प्रश्न ऐकून विनोबा अधिकच स्तब्ध झाले. चित्र न आवडल्याचे भाव त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसूं लागले.

चित्रकार म्हणाला,

" माझ्या गुरूनीं या चित्राची खूप स्तुति केली आहे. हें चित्र प्रदर्शनांत मांडण्यायोग्य आहे असं त्यांनी सांगितलं. हें चित्र जर मी विक्रीस काढलं तर कुणीहि दोनशे रुपयांस विकत घेईल. तुम्हाला हें आवडलं नाहीं ?

विनोबा म्हणाले,

" चित्रं मला खूप आवडतात. परंतु जेव्हा तुम्ही या चित्रावर पन्नास रुपये खर्च झाले असं म्हणालांत तेव्हा माझ्यासमोर दुसरं चित्र उभं राहिलं. या गावाबाहेर एक झोपडी आहे. तिथं एक विणकर राहतो. त्या विणकराच्या मुलाचे गाल, ओठ आणि सर्वच शरीर पांढरं पडलं आहे. विणकर दिवसभर खादी विणतो पण त्याची खादी कोणी विकत घेत नाहीं. त्याच्या कुटुंबाचा खर्च अशा परिस्थितीत तो भागवूं शकत नसल्यानं या मुलाला दुधाचा एक थेंबसुद्धां मिळत नाही. जर या पन्नास रुपयांची खादी खरीदली गेली असती तर त्या विणकराच्या घरांत केवळ आनंद खेळला असता ! त्याच्या मुलाला अन्न आणि दूध मिळालं असतं. एक प्रकारचा नैसर्गिक गुलाबी रंग तिथं चित्रित झाला असता. बालकाच्या निरागस हसण्यानं तो उजळून निघाला असता. देवाची ही सजीव कला मृत्यूच्या दारांत काळवंडत असतांना ही कागदावरची कृत्रिम कला मला कशी आनंद देऊं शकेल ? '

विनोबा आजसुद्धां हेंच सांगतात कीं खादी-ग्रामोद्योगाच्या वस्तूंचा उपयोग केला तर अनेक कारागिरांना प्रोत्साहन आणि रोजी मिळते. त्यांच्या मरगळलेल्या संसारांना टवटवी येते. काय हीसुद्धां एक कला नाहीं ?

---

# ग्रंथ-परिचय—

**सहज समाधी—** लेखकः- प्रा. के. वि. बेलसरे; प्रकाशक; बुकसेलर्स पब्लिशिंग कंपनी, मेहेंदळे बिल्डींग, मुंबई ४. किं. एक रुपया.

हें एक छोटें परंतु प्रत्येक स्त्रीपुरुषानें अवश्य वाचावें असें पुस्तक आहे. त्याचे लेखक प्रा. बेलसरे यांस ब्रम्हचैतन्य महाराज गोंदवलेकर यांच्या कृपेमुळें सहजसमाधीचा लाभ झाला. संसार करीत असतां त्या सहजसमाधीचा लाभ प्रत्येकास व्हावा ह्या सद्भावनेनें त्यांनीं या छोट्या पुस्तकाद्वारें स्वतःचे नि संतांचे अनुभव वाचकांपुढे ठेविले आहेत.

समाधि म्हटली म्हणजे ती ऋषीमुनींनीं, तपस्वी जनांनीं, योगी पुरुषांनीं लावावयाची एक अवस्था अशी आपली सर्वसाधारण समजूत आहे; परंतु ती बरोबर असली तरी प्रत्येक माणसाला सहज समाधी संपादन करून आपलें व इतरेजनांचें समाधान साधतां येतें व जीवन आनंदी बनवितां येतें. सुखाचा प्रपंच कोणता ? जेथें अखंड समाधान नांदत असतें तो. जेथें समाधान नाहीं तेथें फार मोठी व तापदायक पोकळी निर्माण होते. सहजसमाधीच्या योगे ती दूर करतां येते व जीवन आनंदमय बनवितां येतें. तें कसें साधावें व सहजसमाधी अवस्था कशी प्राप्त करून घ्यावी याचें सुंदर नि मार्गदर्शक विवेचन प्रा. बेलसरे यानीं स्वानुभवाच्या व गुरुकृपेच्या सहकार्यानें केलें आहे.

लेखक म्हणतात :— "श्री गोंदवलेकर महाराजानीं अत्यंत गरिबीच्या व अडचणीच्या प्रपंचांत राहून स्वतः सहजसमाधीचा मार्ग आचरून दाखविला, एवढेंच नव्हे तर जो जो मनुष्य त्यांना भेटला, त्याला तो अगदीं सोपा करून प्रेमानें समजावून दिला, व आपलेपणानें त्याच्याकडून तो करवून घेतला. त्यांच्या कृपेच्या छायेखालीं त्या मार्गावर चालण्याचा माझा थोडा अभ्यास झाला. प्रत्यक्ष अभ्यास करूं लागल्यावर त्या विषयींच्या अनेक तार्किक, तात्त्वीक आणि व्यवहारीक अडचणी दूर झाल्या..... हा मार्ग समजावून घेऊन जो कोणी त्याचा अभ्यास करील, त्याला प्रपंच करीत असतांही अभंग समाधान लाभेल असा सद्गुरूंचा आशिर्वाद आहे."

या ९२ पानी छोट्या पुस्तकाचे दोन विभाग आहेत. पहिल्या भागांत अभ्याससंबंधींची तात्वीक भूमिका थोडक्यांत समजावून देण्यांत आली आहे तर दुसऱ्या भागांत सहजसमाधीचा व्यवहार कसा साधावा याचें यथाशक्ति मार्गदर्शन करण्यांत आलें आहे. हा विभाग अनेक उदाहरणांनीं सुस्पष्ट करण्यांत आला आहे.

सहजसमाधी साधण्याचा अभ्यास कसा करावा याचें विवेचन करीत असतां अनेक सूचक नि उद्बोधक गोष्टी सांगण्यांत आल्या आहेत. त्यांत अभ्यासांतल्या पायऱ्या, मी त्याचा आहे, भगवंताचें स्मरण, नामस्मरणाची अपूर्वाई, त्याची इच्छा, साधकाचें पथ्य, त्वमेव सर्वं मम देवदेव, ठेविलें अनंतें तैसेंचि रहावें, वगैरे मथळ्याखालीं केलेलें विवरण सहजसमाधि–योग साधण्याच्या दृष्टीनें अत्यंत उद्बोधक आहे.

"जगांतील कर्मकटकटींत आपलें समाधान अभंग ठेवण्याच्या कलेला सहजसमाधि म्हणतात. प्रत्येक माणसाला या समाधीचा जन्मजात अधिकार आहे. तो भोगण्यासाठींच माणूस जन्माला येतो. ती समाधी साधण्यास लागणारें सर्व सामर्थ्य व साधन साहित्य प्रत्येकापाशीं असतेंच. विवेकानें संधीचा योग्य उपयोग करून भगवंताच्या मार्गावर चालण्यास जो आरंभ करतो त्याच्यामागें भगवंत सद्गुरुपानें उभा रहातो आणि त्याला हरतऱ्हेचें साहाय्य देऊन समाधानापर्यंत पोहोंचवितो."

# शाळकरी मुलें

लेखक : **प्रो. स. बा. हुदलीकर**; (प्रकाशक : प्रा. स. बा. हुदलीकर, १२, नानाभाई लेन, फ्लोराफाऊंटन मुंबई–१, किंमत तीन रुपये. पृष्ठें २४२.)

लहान मुलें म्हणजे आपल्या राष्ट्राचे भावी आधारस्तंभ. बालपणापासून त्यांच्या मनावर सुसंस्कार घडवून भावी काळांत त्यांच्या शिरावर पडणाऱ्या जबाबदारीच्या दृष्टीनें त्यांची शारीरिक नी मानसीक वाढ झाली पाहिजे. हें कार्य अत्यंत महत्त्वाचें तसेंच अत्यावश्यकही आहे. पाश्चात्य राष्ट्रांनीं हें अचूक ओळखून तदनुरूप शिक्षणक्रमाची आखणी केली आहे. अनेक मार्गांनीं या दृष्टीनें त्यांचे अविरत प्रयत्न चालू असतात. अलीकडे कुठें याबतींत आपल्याकडे

जागृती दिसून येऊं लागली आहे. परंतु आमचे फार जुने स्नेही प्रो. हुदलीकर यानीं सुमारें चाळीस वर्षांपूर्वी हें महत्व ओळखून कोणाकडून जरूर तें उत्तेजन नसतां त्यानीं टक्केटोणपे खात हें कार्य अखंड चालविलें आहे. त्यासाठीं त्यानीं बालक मंदिरें चालविलीं ( आजही तो उपक्रम चालू आहे. ) तसेंच मुलांसाठीं 'बालक–मंदिर' या नावाचें मासिक आत्यंतिक झीज सोसून चालविलें आहे. आणि तिसरा मार्ग म्हणजे बालोपयोगी वाङ्मय निर्माण करणें. याही मार्गाची त्यानीं कांस धरली आहे.

'शाळकरी मुलें' ही विद्यार्थिजीवनावर आधारलेली प्रदीर्घ कथा हाही त्यापैकीच एक स्तुत्य उपक्रम आहे.

जर्मन, रशियन, इंग्रजी, फ्रेंच वगैरे भाषा नवीन पद्धतीने शिकविण्याचें एक उपयुक्त कॉलेज त्यानीं गेल्या अनेक वर्षांपासून यशस्वी रीतीने चालविलें असून त्यांतूनही वेळ काढून त्यांनी बालकवर्गाची सेवा सतत निष्ठापूर्वक चालविली आहे. त्यांची सत्तरी उलटली असली तरी कोणाही तरुणानें त्यांची कार्यक्षमता व सतत उद्योगांत रत रहाण्याची वृत्ति पाहून लाजेनें मान खाली घालावी अशा रीतीने ते पहावे तेव्हां कार्यमग्न असतात.

'एन. नोसोव्ह या प्रसिद्ध रशियन लेखकाचें 'स्कूल बॉईज्' हें उपयुक्त पुस्तक त्यांच्या वाचण्यांत आलें. आणि त्याचा आधार घेऊन त्यांनी शाळकरी मुलें ही विद्यार्थिजीवनावरील दीर्घकथा ( एकवीस प्रकरणें ) लिहून प्रसिद्ध केली. कोणत्याही देशांतील मुलें असोत त्यांची प्रवृत्ति जवळजवळ सारखीच असते. ही कथा भाषांतरित आहे, असें मुळींच वाटत नाहीं; इतका तिळा बेमालूम मराठी पेहराव चढविण्यांत आला आहे. त्यात कांहीं प्रासंगिक चित्रेंही घालण्यांत आलीं आहेत. सुंदर छपाई, ठसठसीत टाईप, सुंदर रंगीत बाह्यांग यामुळें हें पुस्तक हातांत पडतांच तें वाचावें असें वाटल्याशिवाय रहात नाहीं. पालकांनीं व शाळाधिकाऱ्यांनीं अशां प्रकारचीं चारित्र्य घडविणारीं पुस्तकें मुलांच्या हातीं पडतील याबद्दल दक्षता बाळगिली पाहिजे.

# श्री रामनवमी महोत्सव

श्री सच्चिदानंद सद्गुरु साईबाबा महाराज शिर्डी यांचा श्रीरामनवमी उत्सव यंदा मि. चैत्र शु. ८।९।१० दिनांक ६ शनिवार पासून सुरू होऊन दिनांक ८ सोमवार रोजीं समाप्त झाला. या उत्सवाकरितां श्री साईबाबा संस्थान शिर्डीचे प्रमुख कोर्ट रिसीव्हर डी. डी. पाटणकरसाहेब यांनीं खातेप्रमुखांची खास सभा बोलावून उत्सवाच्या पूर्वतयारीची रूपरेषा आखली, त्याप्रमाणें भक्तांना उतरण्याच्या जागांची स्वच्छता डी. डी. टी. चे फवारे मारून (स्वच्छ) ठेवण्याचा बंदोबस्त अगोदर करणेंत आला होता. त्याचप्रमाणें पिण्याचे पाण्याची व्यवस्था पाणपोई व अल्पोपहार व भोजनाची व्यवस्था उत्तम ठेवणेस साईबाबा संस्थान अधिकृत भोजनालयास ताकीद देणेंत आली होती. मांडवाची व्यवस्था दिव्यांची रोषनाई ( वाजंत्रीबँड, सूरसनई चौघडा ) तसेच पोलीस बंदोबस्त, होमगार्ड, स्वयंसेवक, कलाकारांची संभावना वगैरेची व्यवस्था चोख ठेवण्यांत आली होती.

दशमीचे दिवशी नित्य कार्यक्रमाव्यतिरिक्त भक्तांच्या सामुदायिक पूजा, अभिषेक व गोपाळकाला कीर्तन श्री. ह. भ. प. अनंत दामोदर आठवले यांचे दही हंडी काला कीर्तन होऊन उत्सव समाप्त झाला. ( यात्रेस सुमारें ५०००० लोक येऊन गेले असावे असा अंदाज आहे.

श्रीरामनवमी उत्सवाकरितां मुंबई, पुणे, नासिक, सोलापूर, मद्रास, म्हैसूर, खानदेश, वऱ्हाड, मध्यप्रांत, मराठवाडा नांदेड, परभणी, निझामाबाद, हैद्राबाद, वगैरे ठिकाणाहून बहुसंख्य भक्तलोक आपल्या कुटुंबांतील बायका-मुलांबाळांसह साईंचे समाधीदर्शनास आले होते, तसेच शिर्डीची जवळपास दहावीस कोसामधील गांवांतील खेडूत लोक [ यात्रा ] पाहण्यास व साईंचे दर्शनास आले होते.

उत्सवांतील नियमित कार्यक्रमाव्यतिरिक्त अष्टमीस सकाळी फोटो पोथीची मिरवणूक दुपारीं श्री. संतकवीदासगणूंचे शिष्य वैद्य श्री. ह. भ. अनंत दामोदर आठवले यांचे कीर्तन, रात्रौ पालखीची मिरवणूक, कापडांची विक्री वगैरे कार्यक्रम पार पडले.

नवमीचे दिवशी परत सकाळी फोटो मिरवणूक व कापडी–जल श्रीचे समाधीवर अर्पण करण्याचा सोहळा, भक्तांच्या सामुदायीक पूजाअभिषेक, रामजन्मोत्सवाचे कीर्तन वैद्य श्री. ह. भ. प. अनंत दामोदर आठवले यांचे, सायंकाळी निशाणाची व रथाची मिरवणुक रात्रौ कलाकारांच्या हजेऱ्या होत्या व त्यासाठी मंदिर रात्रभर भक्तांना दर्शनासाठीं खुलें ठेवलें होतें.

# शिरडी–वृत्त

## मार्च–एप्रील १९६८

या महिन्यांत शिर्डी येथें बाहेरगांवचे भक्त नेहमीप्रमाणें श्री चे दर्शनास आले होते. कांहीं कलावंतांनीं श्रीपुढें हजेरी दिली ती खालीलप्रमाणें:–

**कीर्तन**

श्री. ह. भ. प. दत्तात्रय दिनकर परचुरे दादर मुंबई. स. गवई विठ्ठलराव मराठे यांची कीर्तनें श्री तुकाराम बीज श्री. एकनाथषष्ठी. चैत्रशु. १ गुडीपाडवा व एकादशी या दिवशी झालीं.

**गायन**

श्री. नैनातारा कोल्हापूर संगीतपार्टी कोल्हापूर,

श्री. सौ. कमळ प्रभाकर पाठारे, मुंबई,

श्री. आनंदाबाई अनंत बागळे ,माहीम,

श्री. लिला कोकिळा मलकापूर संगीत पार्टी मलकापूर

श्री. साईलीला भजन मंडळ खडकी ( पुणें )

## नृत्यदर्शन

श्री. जयश्री गडकर मुंबई व कृष्णपाणीकर नृत्यप्रभा मंडळी माहीम.

## मिरवणुकी

रंगपंचमी व गुडी पाडवा या दिवशीं सालाबादप्रमाणें साईच्या रथाची दिवसा सायंकाळी ५ ते७ पर्यंत गावांतून मिरवणूक काढण्यांत आली होती.

### एप्रिल १९६८

या महिन्यांत बाहेरगांवचे भक्तांची गर्दी शिर्डीस बरीच होती. याचें कारण उन्हाळ्याची सुट्टी व श्रीरामनवमीचा उत्सव, यामुळें भक्तांची गर्दी विशेष होती. काहीं कलाकारांनीं श्रीपुढें हजेरी दिली, ती खालीलप्रमाणें:—

## कीर्तन

श्री. ह. भ. प. अनंतराव आठवले वैद्य, पुणे श्री. द. दा. ऊर्फ नानासाहेब रासने पुणे, संस्थान गवई श्री. मराठे यांचीं कीर्तनें नेहमीप्रमाणें झालीं, यांशिवाय श्रीसंत भाऊमहाराज कुंभार पुण्यतिथी व श्री. अक्कलकोटस्वामी महाराज पुण्यतिथी निमित्त दोन कीर्तनें जादा झालीं.

## गायन

श्रीरामनवमीउत्सव ( जागर ) कलाकारांच्या रात्रभर हजेऱ्या झाल्या. कलाकारांत श्री. भरत दत्तात्रय परचुरे दादर यांचेंच फक्त शास्त्रोक्त गायन झालें. बाकी सर्व सुगमसंगीत अभंग असे म्हणणारे सगळे भजनीच होते. ५१ कलाकारांची अशा-रीतीनें हजेरी झाली. ( हे सर्व स्थानिक व जवळच्या खेड्यातील होते. )

## रामनवमीनंतर गायनभजन

यंगफ्रेन्डस् म्युझिक सर्कल ठाणा ( चालक ) श्री. शांताराम सुर्वे ठाणें श्री. एम. एस. शर्मा मुंबई.

## लोकनाट्य

श्री. दत्तोबा तांबे शिरोलीकर मु. शिरोली. जि. पुणें. पन्नासाव्या पुण्यतिथी उत्सवाचा आराखडा ठरविण्यासाठीं मे. गोडसे साहेब चॅरिटी कमिशनर,

मे. पागे साहेब. मे. भारदे साहेब यांनीं या महिन्यात शिर्डीस भेट दिली. त्यावेळी माननीय रिसिव्हर श्री. पाटणकर साहेब यांनीं त्यांना सर्व स्थानिक माहिती दिली.

**हवापाणी**

शिर्डी येथील हवापाणी उत्तम. रोगराई कांहीं नाहीं.

---

—स्वतःमधील ज्या दोषांची जाणीव झाली ते दोष दूर करण्यासाठीं आपली सतत धडपड चालू राहिली पाहिजे. कोणी हितचिंतकानें तुमचे दोष दाखविले तर त्याचें बोलणें शांततापूर्वक ऐकून घेऊन त्या दोषांचें बारकाईनें निरीक्षण करून ते दूर करण्यासाठीं आपण झटलें पाहिजे. याचेंच नाव जगणें.

Books published and Sold by Sai Baba Sansthan, Shirdi

## श्री साईबाबा संस्थान, शिरडी संस्थेतर्फे प्रकाशित व विक्रीकरितां ठेवलेलीं पुस्तकें

| | | | |
|---|---|---|---|
| (१) | श्रीसाईसच्चरित्र (मराठी) | श्री. दाभोळकरकृत | ८-०० |
| (२) | ,, (हिंदी) | श्री. ठाकूर | ४-५० |
| (३) | ,, (गुजराथी) | श्री. सोमपुरा | ४-०० |
| (४) | ,, (इंग्रजी) | Shri Gunaji | ४-०० |
| (५) | ,, (Kannad) | N. S. Anantha Raum | ३-०० |
| (६) | Glimpes of Indian Spirituality-by Pradhan | | १-०० |
| (७) | Glimpes of Indian Spirituality (Telgu) | | १-०० |
| (८) | श्री साईलीलामृत (मराठी) | श्री. आगास्करकृत | २-०० |
| (९) | साईबाबा-अवतार व कार्य (मराठी) | श्री. धोंड | २-०० |
| (१०) | साईबाबांचे ४ अध्याय (मराठी) | श्री. दासगणु | ००-५० |
| (११) | सगुणोपासना (मराठी) | श्री. भीष्म | ००-२५ |
| (१२) | ,, (गुजराथी लिपींत) | श्री. भीष्म | ००-२५ |
| (१३) | श्री रुद्राध्याय ११ वा (मराठी) | श्री. दाभोळकर | ००-१२ |
| (१४) | कीर्तन पंचक (मराठी) | श्री. देव | १-५० |
| (१५) | शीलधी (मराठी) | डॉ. गव्हाणकर | ००-७५ |
| (१६) | श्री साईगीतांजलि (मराठी) | कवि श्रीपाद | ००-१२ |
| (१७) | Guide to Shirdi (English) | | ००-१२ |
| (१८) | स्तवनमंजिरी व सुमनांजली (मराठी) | | ००-२० |

व्ही. पी. ची पद्धत नाहीं.

**Colour pictures of Sai Baba by Neroy**

| | | |
|---|---|---|
| (1) | Baba sitting on Stone $9\frac{1}{2}'' \times 13\frac{1}{2}''$ medium | 00-37 |
| (2) | ,, ,, in Dwarkamai $9\frac{1}{2}'' \times 13\frac{1}{2}''$ medium | 00 50 |

Other different poses of Sai baba in colour according to different sizes varying in prices.

Commission to Sellers 25% except on 2 to 10 for which only 25 nP. and 50 nP. for No. 1 Postage Extra (minimum purchase of Rs. 15). *Can be had from* (मागवा):

1. Executive officer Shri Sai Baba Sanstan, P. O. Shirdi., Dst. Ahmednagar.
2. Sai Baba Office 'Sai Niketan,' Dr. Ambedkar Road, Dadar, Bombay 14.

मुद्रक: पांडुरंग दाजीबा मोरे निर्णयसागर प्रेस, २६।२८ डॉ. एम. बी. वेल्कर स्ट्रीट, मुंबई २
संपादक व प्रकाशक: द. दि. पाटणकर, 'साइ निकेतन', डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कलजवळ, प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुंबई १४.

श्री साईबाबांच्या ५० व्या पुण्यतिथीनिमित्तानें

# श्री साईबाबा फौन्डेशन

स्थापन झाला असून त्यासाठीं निधी जमवीत आहों. आपणांकडून त्यासाठीं खास सहाय्य यावें अशी अपेक्षा आहे.

या खेरीज हॉस्पिटल, बालविभाग, शिक्षण व इमारतीसाठीं निधी गोळा होतो. आपल्या इच्छेप्रमाणें रक्कम विशिष्ट कार्यासाठीं देण्याची कृपा करावी.

## विश्वस्त-मंडळ


१ श्री. एस्. के वानखेडे—महाराष्ट्र राज्याचे फडणीस व कायदे-कानूचे मंत्री.
२ श्री. पी. के. सावंत—महाराष्ट्र राज्याचे शेतकीखात्याचे मंत्री.
३ श्री. एस्. बी. चव्हाण—महाराष्ट्र राज्याचे पाटबंधारे व बीज-खात्याचे मंत्री.
४ श्री. व्ही. एस्. पागे—महाराष्ट्र ले. कौन्सिलचे अध्यक्ष.
५ श्री. टी. एस्. भारदे—महाराष्ट्र राज्य विधि मंडळाचे अध्यक्ष.
६ न्या. मू. जे. आर. मुधोळकर दिल्ली.
७ श्री. पी. जे. चिमुळगुंद—सेक्रेटरी गृहखातें—महाराष्ट्र राज्य.
८ श्री. जी. बी. नेवाळकर.
९ श्री. एन्. डी. साहुकार
१० श्री. वी. आर. हेकणे, प्राचार्य सिडनहॅम कॉलेज.
११ श्री. डी.डी. पाटणकर, रिसीव्हर श्री साईबाबा संस्थान-शिरडी